म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : क्वा.वा
दा. क्र. : ९५५

BVBK-0400955

# राष्ट्रपिता गांधी

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
[illegible] वर्ग
दा. क्र. ९५५ दिनांक .....
विषय किशोर क्र. ४५२

राजा मंगळवेढेकर, बी. ए.

BVBK-0400955

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य चार रुपये

## ※ अनुक्रम ※

महात्म्याचे बालपण
अपूर्णातून पूर्णाकडे
जीवनप्रवाहाची वळणे
परत मातृभूमीला
दक्षिण आफ्रिकेत
अन्यायाशी दोन हात
नवी वाटचाल
पहिला सत्याग्रह
भारताच्या सेवेत
गांधीयुगाचा उदय
अपूर्व दांडीयात्रा
हरिजनांसाठी
व्रतनिष्ठा
चले जाव
महात्म्याचा कारावास
नोआखलीतील शांतीयात्रा
हरे राम !

★

प्रथमावृत्ती : २ ऑक्टोबर १९६७
द्वितियावृत्ती : दीपावली, १४ नोव्हेंबर १९७४

प्रकाशक : ल. गो. परांजपे, ३० सी, खोताची वाडी, गिरगाव, मुंबई ४.
मुद्रक : एच. बी. घाणेकर, न्यू एज प्रिं. प्रेस, ८५ पी. बाळू मार्ग, प्रभादेवी, मुं. २५.

# महात्म्याचे बालपण

'चालता-बोलता हिमालय कधी कुणी पाहिला आहे काय ?'

'होय. ज्या भारतवर्षाच्या उत्तर दिशेला नगाधिराज देवतात्मा हिमालय आहे त्याच भारतवासीयांनी हे देखील दुर्लभ दर्शन अनुभवलेले आहे. आणि एकदा-दोनदा नव्हे, तर देवतात्मा हिमालयाइतक्याच प्राचीन काळापासून अनेक वेळा.

'आणि त्याच थोर वारशाची थोरवी मिरवीत, अखिल जगताला स्तिमित करीत परवा परवाच आमच्या डोळ्यांदेखत आणखी एक मानवी हिमालय आम्ही पाहिला.

'आम्हाला अभिमान वाटतो, आमची छाती फुगते, आम्हांला कृतार्थ वाटते, आमचे मस्तक उन्नत होते. आम्ही स्वतःला धन्य धन्य समजतो की, खरोखरच एक चालता-बोलता, हिंडता-फिरता हिमालय आम्ही आमुच्या या, या डोळ्यांनी पाहिला, या, या कानांनी ऐकला !

कसा दिसत होता ? कसा बोलत होता ? होता हिमालय, पण अंगकाठी कृश, ठेंगणा ठुसकाच, निरागस मुद्रेचा, पण तेजस्वी नजरेचा आणि तुकतुकीत कांतीचा.

हिमालयाची धवलता होती त्याच्या चारित्र्यात, खंबीरता होती त्याच्या निष्ठेत आणि भव्यता होती त्याच्या विचारांत !

जसा वागण्यात तसाच बोलण्यात. शालीन, सौजन्यपूर्ण शब्द ! मृदु, मुलायम आवाज, पण वेधक भाषा ! साधी, सरळ पण अंतःकरणाला हात घालणारी ! प्रसंगी आत्मबलाने कठोर होऊन प्रकटायची. अशा वेळी मंत्राचे सामर्थ्य शब्दांत यायचे नी 'चले जाव !' या घोषणेबरोबर उन्मत्त साम्राज्यदेखील डळमळायचे ! 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठिण वज्रासी भेदू ऐसे'—असा संतांचा बाणा होता.

ढोपरापर्यंत पंचा आणि हातात काठी असा साधू-वेष नि अहोरात्र चिंतनात एक भारत देश !

या मानवी हिमालयाचे नाव होते—मोहनदास करमचंद गांधी. पण ओळखला जाई केवळ 'महात्माजी' किंवा 'गांधीजी' या सुटसुटीत नावाने. गांधी हे आडनाव तरी होते, पण 'महात्मा' ही केवळ पदवी. जनताजनार्दनाने दिलेली. पण तीच विशेषनाम बनली आणि महात्माजी म्हणून मिरवली.

नाव कळले, गाव सांगतो : काठेवाड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातील पोरबंदर हे ते गाव.

याच पोरबंदरला प्राचीनकाळी म्हणत असत सुदामपुरी. कृष्णमित्र सुदामा हा महान् भगवत्भक्त येथे होऊन गेला. पोरबंदरच्या मातीचा गुण असा की, येथे श्रद्धेचे, भक्तीचे, अभंग निष्ठेचे पीक पिकले.

गांधीजींचा पिंड श्रद्धाळू वैष्णवाचा होता. 'वैष्णव जन तो

तेणे कहिये, जो पर पीडा जाणी रे ।' हे संत नरसी मेहतांचे भजन गांधीजींचे फार फार आवडते होते.

गांधीजींना ही भक्तीची देणगी पोरबंदरच्या मातीने जशी दिली, तशीच त्यांचे वडील करमचंद उर्फ कबा आणि आई पुतळीबाई यांच्या श्रद्धाळू जीवनातूनही मिळाली. पिताजी कबा ईश्वरभक्त होते. धार्मिक वृत्तीचे होते. राजकोट संस्थानात त्यांनी दिवाण म्हणून काही दिवस काम केले. एकदा एका इंग्रज अधिकाऱ्याने राजकोटच्या राजेसाहेबांचा उर्मटपणाने अपमान केला. कबांना हे सहन झाले नाही. त्यांनी त्या इंग्रज अधिकाऱ्याला चांगलेच फैलावर घेतले. त्यावेळी तो अधिकारीही चिडला आणि आपल्या भाषणाबद्दल माझी माफी मागा असे कबांना म्हणाला, पण कबा पडले स्वाभिमानी. त्यांनी 'माफी मागणार नाही' म्हणून त्यास सांगताच त्या अधिकाऱ्याने कबांना अटक करविली. अशा धीट स्वभावाचे कबा भगवत् गीतेच्या अध्ययनात, चिंतनात मग्न होऊन जात.

आई पुतळीबाई व्रतवैकल्ये, पूजाअर्चा, उपासतापास, कथा-कीर्तने अशा धार्मिक गोष्टींतच आपला बराचसा वेळ व्यतीत करीत असत. चातुर्मासात सूर्यदर्शन घेऊन अन्नग्रहण करण्याचा त्यांचा नेम असे. पण आषाढ-श्रावणात पावसाची झड लागली म्हणजे दिवस दिवस कधी सूर्यदर्शन घडत नसे. आणि पुतळी-माला उपास घडत असे.

अशा धर्मशील, श्रद्धावान व भाविक माता-पित्यांच्या पोटी तारीख २ ऑक्टोबर १८६९ या दिवशी गांधीजींचा जन्म झाला.

घरचे संस्कार अतिशय साधे, सात्त्विक व सरळ असल्या-मुळे त्यांचा इष्ट तोच परिणाम कोवळ्या मनाच्या मोहनवर झाला. जेवणाच्या आधी व नंतर हातपाय स्वच्छ धुवावेत, देवाचे नामस्मरण करावे, साफसफाई करावी, अभंग-स्तोत्रे गावीत असे वळण आईने लावले. मुलांनी चांगले शिकावे, चांगले व्हावे यासाठी वडीलही प्रयत्न करीत असत. मुलांना शाळेत पोहोचवण्यापूर्वी ते त्यांना फूल देऊन मंदिरात नेत असत. तेथे देवाला फूल वाहून मग ती शाळेत जात असत.

लहानग्या मोहनचे आपल्या आईवर फार फार प्रेम होते. आई प्रातःकाळी लवकर उठे, मौन प्रार्थना करी. मुले उठताच आईला नमस्कार करीत. आई त्यांना शिकवी, "मी स्वतंत्र आहे. मी शूर आहे. मी सदैव सत्य भाषण करीन, असे म्हणा, आणि तसे वागा."

मोहन चार वर्षांचा असतानाच आईच्या प्रेमळ शिकव-णुकीने म्हणत असे, "मी कोणाला त्रास देणार नाही, कोणाचे नुकसान करणार नाही, सर्वांचे भले चिंतीन!"

कबांच्या कुटुंबात मोहनच सर्वांत लहान होता. घरच्या शिक्षणाबरोबरच योग्य वयात त्याला शाळेत दाखल करण्यात आले. पण मोहन काही अति हुशार मुलांपैकी नव्हता. तो शाळेत जायचा ते शिकण्यापेक्षा वेळ घालवण्यासाठीच.

लिहायूवाचायला शिकण्याऐवजी गुरुजनांच्या नकला करण्यातच तो विशेष रस घेई.

परंतु मंदिरात मात्र तो रमून जाई. तेथे गायले जाणारे रामायण तो लक्षपूर्वक ऐकत असे. वीर पुरुषांच्या गोष्टी ऐकण्यातही तो तल्लीन होऊन जाई.

मंदिरात एक भिकारी यायचा आणि मोठ्या आवेशाने स्वातंत्र्याची भक्तिगीते गायचा. मोहनला ती गाणी फार फार आवडायची. ती ऐकून त्याला आनंद व्हायचा, उत्साह वाटायचा.

मोहनची देखभाल करणारी रंभादेखील त्याला किती तरी गोष्टी सांगायची. त्या देवाधर्माच्या असत, तशाच अद्‌भुत चोर-दरवडेखोरांच्या, राक्षस-भुतांच्या असत. जिवाचा कान करून मोहन त्या ऐके, पण मग मात्र त्या काल्पनिक राक्षसांची, भुतांची, डाकूंची भीती घेऊन बसायचा. रात्र झाली की अंधाराचे विलक्षण भय त्याला वाटे. साप, विंचूकाटा, यांच्या धास्तीने तो गळून जाई. झोपायच्या खाटेखाली कोणी छपून तर राहिलेले नाही, या संशयाने तो थरथरू लागायचा, रडू लागायचा. एके दिवशी रंभा थोड्या रागानेच म्हणाली, "असल्या भ्याडपणाची लाज वाटायला हवी. मोठेपणी कसे होणार तुझे ?" आणि मग त्याला जवळ घेऊन कुरवाळीत म्हणाली, "हे बघ मोहन, एक युक्ती सांगून ठेवते तुला. भीती वाटू लागली की, 'राम राम राम राम' म्हणत जा."

मोहनला रामनामाने बळ दिले. हळूहळू त्याच्या मनातली भीती मावळली. तो धीट बनला.

अशी सात एक वर्षे उलटली आणि मोहन कबांच्या नोकरीच्या गावी, म्हणजे राजकोटला आला. तो आता राजकोटच्या शाळेत जाऊ लागला. नवे गाव, नवी शाळा, नवीन मित्र ! परंतु मोहन होता जात्याच बुजरा. भित्रा. मित्रांत मिसळायचा नाही. त्यांच्याशी खेळायचा नाही. त्यांनी टिंगल-टवाळी केली तर ? ते आपल्याला हसले तर ? अशा भयाने तो एकटाच राही. शाळेची घंटा घणघणू लागली की नेमके त्याच वेळी वर्गात पाऊल टाकायचे नि शाळा सुटली रे सुटली की तडक घरी परतायचे.

मोहन चौथीत गेला. संस्कृत-भूमितीसारखे नवे विषय आले. गणिताशी त्याची दोस्ती कधीच जमली नव्हती. भूमिती भरीला आली. सुरुवातीला काहीच कळेना. पण मोहनही मग हट्टाला पेटला. अभ्यासाची शिकस्त केली नी काय आश्चर्य, त्याला भूमितीएवढा दुसरा सोपा विषय वाटेना !

संस्कृतपाशी गाडी अडलीच होती. मोहनने ठरवले, 'नकोच ते अवघड संस्कृत. पर्शियन शिकू.' संस्कृत शिकवणारे गुरुजी म्हणाले, 'वैष्णव ना मोहन तू !' आपली धर्मभाषा नको का शिकायला ? कळत नसेल तर येत जा माझ्याकडे. शिकवीन मी. मधुर, सुंदर भाषा आहे. कळायला लागली म्हणजे तुलाच आनंद होईल.

गुरूजींची आस्था पाहून मोहनने विचार बदलला. तो संस्कृत शिकू लागला. मोहन तीव्र बुद्धीचा विद्यार्थी नव्हता, तरी मेहनती होता. वेळच्या वेळी अभ्यास करी. कुणी आपल्याला 'ढ' म्हणू नये, शिक्षा होऊ नये, थट्टा करू नये म्हणून तो फार जपून वागे.

एकटेच दूरवर फिरायला जाण्यात त्याला फार आनंद मिळे. निसर्गदर्शनाची त्याला अति आवड होती. म्हणून तो फिरण्याचाच व्यायाम घेई आणि शाळेतल्या खेळांपासून दूर राही. पण हे खेळ सक्तीचे असत. त्यामुळे ते बुडवल्याबद्दल मोहनला एकदा शिक्षकांच्याकडून चोपही मिळाला.

घराबाहेर शाळेत जरी मोहन असा लाजाळू व मंद असे, तरी घरात मात्र त्याची बडबड सुरू असे. अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारून तो आईला भंडावून टाकी.

दादाभाई नावाचा एक अस्पृश्य नोकर घरकामासाठी होता. मोहनला आई म्हणे,

"मुलांनी अस्पृश्यांना शिवू नये, असे आपल्या धर्मात सांगितलेले आहे."

"का बरं ? दादाभाईचा हात मी धरला तर काय होईल ? त्यानं काय केलय ?" मोहनने विचारले.

"तसं वाईट दादाभाईनं केलेलं नाही बाळ; पण तो अस्पृश्य आहे. त्यांना शिवू नये असं देवानं सांगितलंय" भावडी आई म्हणाली.

"पण का?" मोहनची जिज्ञासा वाढली, "तो काय खोटं बोलतो?"

"नाही."

"चोरी करतो?"

"मुळीच नाही. दादाभाई मोठा इमानदार नोकर आहे."


"मग का नाही शिवायचं त्याला?" मोहन विचारी. भोळी, श्रद्धाळू आई काय सांगणार त्याला! मोहनला सत्य आणि न्याय याविषयी आत्मीयता वाटे. आणि म्हणूनच त्याचे चिमुकले हृदय अस्पृश्यांची कड घेऊन उठे.

शाळेतही काही अस्पृश्य मुले होती. आणि शिक्षक व अन्य विद्यार्थी त्यांना लांब ठेवीत, दूर बसवीत. मोहनला हे अन्यायाचे वाटे, चुकीचे वाटे. आईची शिकवण त्याची जिज्ञासा पुरी करू शकली नव्हती. आईला पसंत पडणार नाही हे ठाऊक असूनदेखील त्याने एका लहानग्या अस्पृश्य मुलाशी मैत्री केली. त्याला जवळ केले. त्याच्या पाठीवरून हात फिरवताना मोहनला वाटले, आपण आपल्या पापातून मुक्त होत आहोत. न्यायाला जवळ करीत आहोत.

मोहनला तसा वाचनाचाही विशेष नाद त्या वयात नव्हता. पण एकदा रामायणातली श्रावणाची गोष्ट त्याच्या वाचनात आली, आणि तो त्याची मातृ-पितृभक्ती पाहून पार भारावून गेला. श्रावण मोहनच्या हृदयपटलावर सेवेचा ठसा

उमटवून गेला. आपण श्रावणासारखे सेवाभावी व्हायचे अशा विचाराने मोहनचे हृदय भरून गेले.

त्याच वेळी आणखी एक गोष्ट घडली. गावात एक नाटक मंडळी आली होती. एकदा कबांनी साऱ्यांना नाटकाला नेले, नाटक होते सत्यवादी हरिश्चंद्राचे. हरिश्चंद्राची सत्यनिष्ठा, त्यासाठी आत्मक्लेश भोगण्याची तयारी, हे सारे प्रसंग पाहून मोहनच्या अंतःकरणात त्या थोर सात्त्विक व महान् पुरुषाविषयी विलक्षण आदर निर्माण झाला. त्याला विचार करताना वाटे, "हरिश्चंद्राप्रमाणे सगळेच लोक का नाही सत्याने आणि भलेपणाने वागत ?" श्रावण आणि हरिश्चंद्र यांच्या कथांनी मोहनला सेवेची, सत्याची व सत्त्वाची जाण दिली. या श्रेष्ठ गुणांचा तो पूजक बनला, भक्त बनला आणि त्या भक्तीनेच त्याच्या भावी आयुष्यात महात्मतेचे महाद्वार उघडले !



# अपूर्णातून पूर्णाकडे :

जीवनाला लढाईची उपमा दिली जाते; कारण अनेक तऱ्हेची दुःखे, खेद, संकटे आणि कटकटी या साऱ्यांशीच सदैव दोन हात माणसाला करावे लागतात व सुख, हर्ष, पराक्रम हस्तगत करावे लागतात.

लोभ, मोह, काम, क्रोध, मद, मत्सर हे षड्रिपु जीवनाच्या वाटेवर ठायी ठायी दबा धरून बसलेले असतात. माणसाच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन त्याला पछाडण्यासाठी टपलेले असतात. आणि बिचारा हाडामांसाचा अपूर्ण मानव त्यांची कधीना कधी शिकार बनतो !

मोहनच्या कुमार वयात ह्या शत्रूंनी त्याला मित्रांच्या रूपाने गाठले. चौदा-पंधरा वर्षांचा तो असतानाची घटना. मोहन दुर्बल, अशक्त व कमकुवत शरीराचा बनला होता. त्याला थोडेसेही धावणे वा जलद चालणे होईना की ओझे उचलता येईना. मुले त्याच्या दुबळेपणाला हसत, थट्टा करीत. मोहनला वाईट वाटे.

शरीर सुदृढ करण्याचा विचार करून त्याने एका धष्टपुष्ट, थोराड हाडापेराच्या मुलाशी मैत्री केली. हा मुलगा मोहनच्या थोरल्या भावाचा आधी मित्र होता. त्याचे अवगुण घरातील सर्वांना ठाऊक होते. म्हणून आईने, भावाने मोहनला धोक्याचा

इषारा दिला. मोहन म्हणाला, "तुम्ही चिंता करू नका. मी त्याला सुधारीन. चांगला बनवीन."

पण झाले विपरीत. त्या मित्राबरोबर आणखी काही तसल्याच मित्रांची संगत जडली आणि मोहनलाच त्यांनी उलट्या अर्थाने सुधारला !

सुरुवात झाली विडी ओढण्यापासून. मित्रांच्या टोळक्यात अष्टौप्रहर राहिल्याने केव्हा कोण जाणे, पण मोहनचे पाऊल घसरले, चित्त विचलित झाले. दोन बोटांच्या चिमटीत विडी पकडून, झुरके घेत घेत, तोंडामधून धुराचे लोटच्या लोट सोडण्यात त्याला मजा वाटू लागली. मजेचे व्यसन झाले आणि व्यसनासाठी आणखी एकदा पाऊल घसरले. विड्यांची तलफ भागविण्यासाठी पैसे हवेत ! मित्राने सल्ला दिला.

"नोकर-चाकरांच्या चिरीमिरीतून मारीत जा."

"म्हणजे चोरी करू ? आणि कोणी पाहिले तर ?"

कोण पाहातंय ? पैसे आणलेस तर उंची सिगरेट ओढू. पाहा कशी मजा येते !

मोहनला मोह आवरला नाही. घरातल्या म्हाताऱ्या नोकराने कसेबसे वाचवून ठेवलेले पैसे तो व्यसनासाठी चोरू लागला. मोहन चोर बनला.

पण त्या पैशांची सिगरेट ओढताना त्याचे मन त्याला खाई. स्वतःविषयी त्याला घृणा वाटे. आपण हे सोडले पाहिजे असे त्याला वाटे नि तो अस्वस्थ होई. पण वाईट मित्रांच्या संगतीत तो आता पुरता अडकला होता. तो जेव्हा असे काही

बोले तेव्हा मित्र त्याला उपहासाने हसत. म्हणत, " भित्रा " डरपोक ! छीः ! आणि पुन्हा सद्विचारांपासून मोहन दूर दूर जाई.

कुसंगतीचा एवढा जबरदस्त प्रभाव त्याच्यावर पडला होता की मोहन एकसारखा अधःपतित बनत चालला होता. दुबळे शरीर सशक्त करावयाचे राहूनच गेले होते. मित्रांजवळ गोष्ट काढली तेव्हा ते म्हणाले,

" अरे त्यात काय आहे ! डाळ-भात खाऊन मात्र होणार नाही हं ! "

" मग कशाने होईल ? " मोहनने विचारले.

" त्यासाठी मस्त मटण खाल्ले पाहिजे. "

" म्हणजे मांस ! मी तर शाकाहारी आहे."

" अरे सोड. मटण खाणार नाहीस तर असाच मरतुकडा राहा मग. इंग्रज लोक पाहा. डुकराचे मांस दाबतात, चांगले उंचे पुरे आणि तगडे बनतात. फुकट नाही दुसऱ्यांवर राज्य करीत. मोहन, आपण आपले हे शाकाहारी वगैरे राहण्याचे जुने-पुराणे रीतिरिवाज आता बदलले पाहिजत, नाहीतर या दुबळेपणापायी उरलासुरला हिंदुस्तानही डुबून जाईल. "

" खरं म्हणतोस ! " मोहनने जिज्ञासेने विचारले.

" मग काय ! पाहा माझे दंड, गर्दन, मांडीचे पट कसे वळलेले आहेत. कशामुळे ? मटण चापतो म्हणून. आपल्याला बुवा चोराचिलटाची किंवा सापविंचवाची बिलकूल भीती वाटत नाही. का ? ताकद आहे. लोळवीन एकेकाला. "

मित्राचा तो शक्तीचा आविष्कार पाहून तर मोहन ढेपाळलाच, तो म्हणाला,

'ठीक आहे. खाईन मी मटण.'

आणि मग कार्यक्रम ठरला. सवय नसल्यामुळे मोहनला ते गिळणे फारच जड गेले. किळसही आली आणि नंतर तो भलताच अस्वस्थ झाला. त्याला पोटात गेलेले बकरे 'बें बें' करून केविलवाणेपणाने ओरडत आहे असा भास झाला!

पण पुन्हा सद्विचारांवर बुराईने मात केली. हळूहळू मोहन पट्टीचा मांसाहारी बनला. त्याला त्याची चटक लागली. मधला भाऊही त्या कार्यक्रमात सामील असे. बाहेर जेवण झाल्यावर घरी "भूक नाही" म्हणून धडधडीत असत्य ठोकून देण्यातही त्यांना काही वाटेनासे झाले.

मधल्या भावाने तर ही चटक पुरविण्यासाठी पंचवीस रुपयांचे कर्ज बाहेर करून ठेवले होते. हे फेडायचे कसे? मोहनने थोरल्या भावाचे सोन्याचे कडे नेऊन त्यातील थोडे सोने काढून ते विकून कर्ज चुकविले!

पण इतके झाले तरी मोहनचा पिंड काही असा वाह्यात नव्हता. त्याच्यावर झालेले संस्कार असे उथळ वा उडाणटप्पूपणाचे नव्हते. ते सद्वर्तनाचे, भलेपणाचे, धर्मनिष्ठ व भाविक होते. एकदा तर त्याने श्रावण आणि हरिश्चंद्राचा आदर्श जीवनापुढे ठेवला होता. मग असा मुलगा कायमचा कसा वाया जाईल? कुसंगतीने, बाळसुलभ मनाला पडणारे मोह

त्याला आवरता आले नाहीत इतकेच. पण त्या मोहमयी व्यसनात, त्या कुसंगतीत त्याचे संस्कारी मन फार दिवस रमू शकले नाही. त्याला त्याचा वीट आला, 'आपण घोर पातक करीत आहोत' असा आक्रोश त्याचे अंतःकरण करू लागले. स्वतःचाच अधःपात त्याचे डोळे पाहू लागले नी स्वतःचीच निंदानालस्ती त्याचे कान ऐकू लागले !

मोहन अस्वस्थ झाला, बेचैन बनला !

'या पापासाठी प्रायश्चित्त घेतलेच पाहिजे.' त्याचे मन त्याला सांगू लागले. स्वतःच्याच दुष्कृत्यांची लाज वाटून काळवंडलेल्या मोहनने ठरवले, आपण आता आत्महत्त्या केलेली बरी. धोत्र्याचे बी विषारी असते असे त्याने ऐकले होते. रानात जाऊन ते बी त्याने व त्याच्या एका मित्राने पैदा केले. नंतर ते दोघे मंदिरात आले. देवाचे दर्शन घेतले. पण बी खाण्याची हिंमत होईना. मृत्यूचे भय वाटू लागले. आत्महत्त्येलाही एक प्रकारचे धैर्य असावे लागते.

पश्चात्तापाने पोळून निघालेल्या मोहनने मग वडिलांच्या कानी सारा प्रकार घालून त्यांची क्षमा मागायची व ते देतील ती शिक्षा भोगायची असा निर्णय स्वतःच्या मनाशी केला.

कबा गांधी वार्धक्याने आजारी होते. त्यांच्या समोर बोलण्याची हिंमतही मोहनमध्ये नव्हती. त्याने मग सारे काही प्रांजलपणाने कागदावर लिहून काढले आणि 'माझ्या ह्या अपराधांबद्दल आपण द्याल ती शिक्षा मी निमूटपणे

भोगीन. यापुढे मात्र मी असे वर्तन करणार नाही असे वचन देतो.' असे लिहून ती चिठ्ठी वडिलांच्या हाती नेऊन दिली. कबा भाविक असले तरी त्यांचा स्वभाव थोडा उग्र होताच. मोहनला भय वाटत होते, आता कबा काय काय बोलतील, काय काय करतील !

पण नवलच घडले !

कबांनी ती चिठ्ठी वाचली आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा ओघ वाहू लागला. डबडबलेल्या नजरेनेच त्यांनी, लज्जेने चूर होऊन गेलेल्या मोहनकडे पाहिले. मग हातातली चिठ्ठी चुरगाळून टाकली आणि आपल्या क्षीण हातांनी मोहनला कुरवाळले. बस् ! एक नाही दोन नाही.

परंतु त्या प्रेमयुक्त मौनाचा एवढा प्रभाव मोहनवर पडला की त्याचे सारे जीवन उजाळून निघाले. क्रोधापेक्षा प्रेमात केवढी शक्ती असते याचे प्रत्यंतर त्या दिवशी मोहनला झाले. अहिंसेची ताकद कळली. प्रेमाश्रूंचे सामर्थ्य समजले आणि जीवनातील एका महान सत्याचे दर्शन घडले. जीवनभर याच सत्याचा त्यांनी पुढे पाठपुरावा केला. याच लहानशा प्रसंगातून त्यांना जीवननिष्ठेचा लाभ झाला !

अपूर्णातून पूर्णाकडे या दिशेने पुढला प्रवास सुरू झाला—

★

# जीवन प्रवाहाची वळणे

कबा गांधी थकले-भागले होते. मोहन अद्याप लहानच होता. पण त्यांच्या मनात आले की त्याचे दोनाचे चार हात करून मोकळे व्हावे. एक मोठी जबाबदारी संपेल.

मोहनचे एक काका होते. त्यांचाही मुलगा मोहनएवढाच होता. त्यांनाही वाटे, 'आपण तर वृद्ध झालो, मरणापूर्वी मुलाचे लग्न करून टाकावे, सूनमुख पाहावे.'

दोघा भावांनी विचार केला आणि मुलांची लग्ने उरकून घेण्याचा निर्णय घेतला. त्या काळी बालविवाहाची पद्धत भारतात सर्वत्र रूढ होती.

घरात वडील माणसांत चालणारी चर्चा, बोलणे, येणे-जाणे पाहून मोहनच्या एवढेच लक्षात आले की काही तरी चालले आहे, काही तरी शिजते आहे. पण काय चालले आहे आणि शिजते आहे याचा मात्र त्याला नेमका पत्ता नव्हता. त्याचे लग्न ठरवले जात होते, पण त्याला मात्र कोणीच त्याविषयी विचारीत नव्हते.

एके दिवशी मोहनला छानदार नवीन कपडे घालायला मात्र मिळाले आणि नंतर बाहेरही नेले. तेव्हा कुठे त्याला समजले की, आपले आता लग्न होणार आहे !

नवे नवे कपडे, अलंकार, पक्वान्नांची जेवणे, वाजंत्री, पाहुणे, मजाच मजा होणार म्हणून मोहन खुशीत होता; आनंदात होता !

आपल्या येथून जीवनातील एक गंभीर परिवर्तन घडवून आणणारा महान क्षण येऊन ठेपला आहे, नवीन जबाबदारी आपण स्वीकारणार आहोत, या विचारांचा मागमूसही त्या निर्व्याज वयात मोहनच्या ठायी नव्हता.

मुहूर्त ठरला. आप्तस्वकीयांनी व स्नेहीमंडळींनी घर भरून गेले. उचित वेळी लग्न लागले. छोट्या कस्तुरबांनी मोहनदास गांधींची धर्मपत्नी म्हणून प्रवेश केला आणि गांधीजींच्या सर्व तऱ्हेच्या जीवन-प्रयोगात तनमन अर्पून त्या विरघळून गेल्या.

कबा गांधींनी अंथरूणच धरले होते. दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत होती. त्यांना भेटण्यासाठी हिंदू-मुसलमान आदी सर्व धर्मीय मित्रमंडळी घरी येत असत आणि कबांच्या अंथरूणाशेजारी बसून चर्चा करीत असत. अशा वेळी मोहन-दास बहुधा तेथेच वडिलांच्या सेवेत असे. त्यांच्या कानावर ही चर्चा अनायासे पडे आणि किती तरी नवीन नवीन ज्ञान मिळे. हिंदू, मुसलमान आदी धर्मांतील उच्च तत्त्वांशी सहज-पणेच ओळख झाली. त्यामुळे सर्व धर्मांविषयी आदरयुक्त समभाव बाळगण्याची शिकवणही त्याला त्याच वेळी मिळाली. अहिंसेचे श्रेष्ठत्व, प्रेमाचे महात्म्य, सत्याची थोरवी पुन्हा एकदा नीट कळली. याच सुमारास एका गुजराती काव्याने

# जीवन प्रवाहाची वळणे

कबा गांधी थकले-भागले होते. मोहन अद्याप लहानच होता. पण त्यांच्या मनात आले की त्याचे दोनाचे चार हात करून मोकळे व्हावे. एक मोठी जबाबदारी संपेल.

मोहनचे एक काका होते. त्यांचाही मुलगा मोहनएवढाच होता. त्यांनाही वाटे, 'आपण तर वृद्ध झालो, मरणापूर्वी मुलाचे लग्न करून टाकावे, सूनमुख पाहावे.'

दोघा भावांनी विचार केला आणि मुलांची लग्ने उरकून घेण्याचा निर्णय घेतला. त्या काळी बालविवाहाची पद्धत भारतात सर्वत्र रूढ होती.

घरात वडील माणसांत चालणारी चर्चा, बोलणे, येणे-जाणे पाहून मोहनच्या एवढेच लक्षात आले की काही तरी चालले आहे, काही तरी शिजते आहे. पण काय चालले आहे आणि शिजते आहे याचा मात्र त्याला नेमका पत्ता नव्हता. त्याचे लग्न ठरवले जात होते, पण त्याला मात्र कोणीच त्याविषयी विचारीत नव्हते.

एके दिवशी मोहनला छानदार नवीन कपडे घालायला मात्र मिळाले आणि नंतर बाहेरही नेले. तेव्हा कुठे त्याला समजले की, आपले आता लग्न होणार आहे!

नवे नवे कपडे, अलंकार, पक्वान्नांची जेवणे, वाजंत्री, पाहुणे, मजाच मजा होणार म्हणून मोहन खुशीत होता; आनंदात होता !

आपल्या येथून जीवनातील एक गंभीर परिवर्तन घडवून आणणारा महान क्षण येऊन ठेपला आहे, नवीन जबाबदारी आपण स्वीकारणार आहोत, या विचारांचा मागमूसही त्या निर्व्याज वयात मोहनच्या ठायी नव्हता.

मुहूर्त ठरला. आप्तस्वकीयांनी व स्नेहीमंडळींनी घर भरून गेले. उचित वेळी लग्न लागले. छोट्या कस्तुरबांनी मोहनदास गांधींची धर्मपत्नी म्हणून प्रवेश केला आणि गांधीजींच्या सर्व तऱ्हेच्या जीवन–प्रयोगात तनमन अर्पून त्या विरघळून गेल्या.

कबा गांधींनी अंथरूणच धरले होते. दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत होती. त्यांना भेटण्यासाठी हिंदू–मुसलमान आदी सर्व धर्मीय मित्रमंडळी घरी येत असत आणि कबांच्या अंथरूणाशेजारी बसून चर्चा करीत असत. अशा वेळी मोहन-दास बहुधा तेथेच वडिलांच्या सेवेत असे. त्यांच्या कानावर ही चर्चा अनायासे पडे आणि किती तरी नवीन नवीन ज्ञान मिळे. हिंदू, मुसलमान आदी धर्मांतील उच्च तत्त्वांशी सहज-पणेच ओळख झाली. त्यामुळे सर्व धर्मांविषयी आदरयुक्त समभाव बाळगण्याची शिकवणही त्याला त्याच वेळी मिळाली. अहिंसेचे श्रेष्ठत्व, प्रेमाचे महात्म्य, सत्याची थोरवी पुन्हा एकदा नीट कळली. याच सुमारास एका गुजराती काव्याने

त्याला आकृष्ट केले. 'तुला जर एखाद्याने पेलाभर पाणी दिले तर तू त्याला पोटभर जेऊ घाल.' अशा अर्थाचे परोपकाराची शिकवण देणारे व मानवतेचा धर्म समजावून सांगणारे ते सुंदर काव्य होते!

आणखी काही दिवस गेले नि कबांच्या प्रयाणाचा दिवस उगवला. त्यांच्या आजारात मोहनने त्यांची अत्यंत भक्तिभावाने सेवा केली. वडिलांच्या सहिष्णु व गंभीर स्वभावातून त्याला खूपच शिकायला मिळाले. शेवटचा क्षण जवळ आला तेव्हा क्षीण झालेल्या कबांनी खूण करून भावाकडून लिहिण्यासाठी कागद-पेन्सील मागून घेतली आणि बोलता येत नव्हते म्हणून लिहिले, 'अंत्ययात्रेची तयारी करा!'

अशा या थोर पित्याचे पितृछत्र हरपले!

आता पुढे काय? मोहन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला होता. डॉक्टर व्हावे की अध्यापक व्हावे? सरकारी नोकरी करावी की खाजगी उद्योगधंदा? घरामध्ये चर्चा सुरू झाली. आई, वडील भाऊ, पत्नी विचार करू लागले. शेवटी ठरले की भावनगरच्या कॉलेजमध्ये मोहनने वकिलीचा अभ्यास करावा.

दरम्यान आणखी एक घटना घडली. कबांचे एक ब्राह्मण मित्र त्यांच्याकडे आले. ते चांगले सुशिक्षित व सुसंस्कृत गृहस्थ होते. त्यांची मतेही सुधारक होती. त्यांनी मोहनला एकदा विचारले, "तू विलायतेस का नाही जात शिकायला? माझा मुलगा गेला आहे."

विलायत! या सूचनेने मोहनला आनंद झाला. एक नवीन मार्ग दिसला.

परंतु इतक्या लांब मोहनने जावे याला आईने विरोध केला. शिवाय विलायतेला गेलेली मुले अधार्मिक बनतात, मांस खातात, दारू पितात, सिगारेट ओढतात. वडील माणसांविषयी आदरबुद्धी बाळगीत नाहीत असे काही बरेच तिने ऐकले होते. त्यामुळे आईच्या दृष्टीने विलायत म्हणजे नरक!

पुनः विचारमंथन सुरू झाले. मोहनची तर इच्छा फार होती. कर्ता थोरला भाऊ मदत करायला तयार होता. शेवटी आईने एका जैन स्वामीला काय करावे म्हणून विचारले. त्यांनी सांगितले, 'मी सांगतो त्या प्रतिज्ञा घेऊन त्याने जावे.'

प्रतिज्ञा घेण्यास मोहनची तयारी होतीच. स्वामीपुढे गुडघे टेकून अत्यंत श्रद्धेने त्याने प्रतिज्ञा उच्चारली, 'ईश्वरसाक्ष मी प्रतिज्ञा करतो की, मी विलायतेत पवित्र राहीन, मांस खाणार नाही, दारू पिणार नाही व परस्त्रीला स्पर्श करणार नाही. स्वतःची पत्नी व मुलगा यांची आठवण हृदयामध्ये पावित्र्याने जतन करीन.'

आईने मोठ्या प्रेमाने मोहनला छातीशी धरले. अश्रूंनी दाटलेल्या डोळ्यांनी व भरलेल्या स्वरांनी आशीर्वाद दिला.

सर्वांचा निरोप घेऊन मोहन विलायतेला जाण्यासाठी मुंबईला आला. आईचा विरोध मावळला होता, पण जमातीच्या

लोकांनी पंचायत भरवून परदेशगमन निषिद्ध असल्याने मोहनच्या प्रयाणास विरोध केला होता; परंतु आईची व वडील बंधूंची संमती आणि आशीर्वाद पाठीशी होता; त्यामुळे मोहनने जमातीच्या विरोधाची पर्वा केली नाही.

विलायतेला जाणाऱ्या आगबोटीत जागा निश्चित करण्यात आली. आवश्यक कपडेलत्ते, सामानसुमान घेण्यात आले. अखेरीस गांधीजी इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरले.

विलायती वातावरण आणि विलायती हवा पाहून सुरुवातीच्या काळात गांधीजी गांगरून, गोंधळून गेले. विलायती समाजातील रीतीरिवाज, चालण्या-बोलण्याच्या पद्धती, पोषाखाच्या तऱ्हा, छे! छे! हे सगळेच शिकायला हवे. त्याशिवाय आपण सुसंस्कृत व सभ्य गृहस्थ म्हणून मानले जाणार नाही; गांधीजींच्या मनाने घेतले. त्यांचा पोषाख पाहून एक-दोन मित्रांनी आधीच योग्य त्या सूचना दिल्या होत्या. त्यातून आपले हसे होऊ नये, कोणी गावंढळ, अडाणी म्हणू नये, असंस्कृत समजू नये ही गांधीजींची इच्छा.

मग काय! त्यांच्या मनाने ठरवले की, 'आपण अद्यावत सभ्य गृहस्थ बनायचे!'

आणि त्यानुसार मग सूट, बूट, टॉय, हॅट असा पोषाख आला. केस व्यवस्थित कसे दिसतील, कसे राहतील याची काळजी झाली. सुगंधी तेले व अन्य प्रसाधनांची साधने आली. उत्तम संभाषण कला अवगत व्हावी यासाठी खास शिक्षक ठेवण्यात आला आणि युरोपीय समाजात शिष्टसंमत मानले


गेलेले नृत्यःशिक्षणदेखील झाले. नृत्याबरोबर व्हायोलिन हे तंतुवाद्य आले. खर्च बराच वाढला. थोरला भाऊ तिकडे काटकसर करून धाकट्यासाठी मोठ्या उमेदीने व जिव्हाळ्याने पैसे पाठवीत होता. आणि धाकटा इकडे 'सभ्य गृहस्थ' बनण्याच्या नादात रमला होता. युरोपीय समाजात वावरताना आणखीही काही मोहाचे प्रसंग आले. मित्रांबरोबर तिकडील एका शाकाहारी संघात जाण्याची संधी त्यांना एकदा लाभली. तेथील एक महिला छचोर स्वभावाची होती. तिचे हावभाव, हास्यविनोद उथळ स्वरूपाचे होते. गांधीजी चमकले. त्यांना आपल्या प्रतिज्ञेचे स्मरण झाले आणि विचार करता करता स्वतःच्या वागणुकीचे भान झाले. ते मनाशी म्हणू लागले, 'कशासाठी आलो आपण इकडे? काय हा अनावश्यक खर्च? या भारी कपड्यांची, नृत्याची, केशभूषेची काय गरज? ही काय संस्कृती आहे? सभ्यपणा आहे?'

मनाच्या अशा अवस्थेत असतानाच त्यांच्या व्हायोलिन शिक्षिकेने त्यांना साध्या राहणीचा उपदेश केला. काही मित्र म्हणाले, 'आम्हाला गीता समजावून सांगा.' आणि गांधीजींच्या वाहवत चाललेल्या जीवन प्रवाहाला उचित असे वळण मिळाले. त्यांनी महागडे हॉटेलचे जेवण बंद केले. लहानशी खोली भाड्याने घेतली. स्वतः स्वयंपाक करू लागले. अभ्यासात मन गुंतवू लागले. फावल्या वेळात राम, कृष्ण, येशू, बुद्ध, मुहम्मद या धर्मावतारांच्या शिकवणुकीचे अध्ययन, मनन करू लागले.

भगवत्‌गीतेची ओळख झाल्यापासून त्यांना नवीन आत्मबल प्राप्त झाले.

‘ विषयांचे करी ध्यान, त्यास तो संग लागला ।
संगांतून फुटे काम, क्रोध कामात ठेवला ॥
क्रोधातून जडे मोह, मोहाने स्मृती लोपली ।
स्मृती लोपे बुद्धिनाश, म्हणजे आत्मनाशची । ’

ह्या गीताईच्या उपदेशाने त्यांचे डोळे खाडकन्‌ उघडले. केवढे मौलिक विचार ! गांधीजींना गीतेने तारले. याच सुमारास बायबलही त्यांनी वाचले. सद्‌विचारांची मोहिनी त्यांच्या भरकटलेल्या मनाला पडली. ते स्थिर झाले, योग्य मार्गावर आले.



# मातृभूमीला परत

ठायी ठायीचे मोह पाश, अडीअडचणी पार करून गांधीजी अखेरीस बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले. आता विलायतेत थांबण्याचेही कारण नव्हते. शिवाय आईच्या दर्शनासाठी मन उत्सुक बनले होते. अधीर झाले होते.

१८९१ सालचा जून महिना होता. एके दिवशी मुंबई बंदरात मोहनदास करमचंद गांधी हे 'बॅरिस्टर गांधी' म्हणून उतरले. वडील बंधू उतरून घेण्यासाठी आलेच होते. बऱ्याच दिवसांनी भावाभावांची भेट झाली. अवांतर क्षेमकुशल झाले. आणि अधीरतेने गांधीजींनी, 'आई कशी आहे?' म्हणून विचारले, पण बंधू गप्प राहिले. पुन्हा तोच प्रश्न गांधीजींनी विचारला आणि बंधूंचे डोळे भरून आले. ते तसेच खाली मान घालून उभे राहिले.

गांधीजींना सारे उमगले. आईचे छत्र देवाने हिरावून नेले याच त्यांना अपार दुःख झाले. धाकट्या भावाच्या अभ्यासात व्यत्यय नको, इतक्या लांब परदेशात त्याचे सांत्वन तरी कोण करणार, याच उद्देशाने वडील बंधूंनी धाकट्याला कळविले नव्हते. गांधीजींनी हा वज्राघात विचाराने सहन केला.

गांधीजी जात–पंचायतीची पर्वा न करता त्यावेळी विलायतेला गेले हे खरे, परंतु त्यांच्या माघारी इकडे जमातीत

दोन पक्ष निर्माण झाले होते. काही लोक गांधीजींच्या बाजूचे होते, तर काही विरुद्ध. गांधीजी परत आल्यानंतर बंधूंना वाटले की आता हा झगडा मिटवून टाकावा. म्हणून त्यांनी गांधीजींना म्हटले, 'मोहन, तू परदेशगमन केल्याबद्दल प्रायश्चित्त घेऊन टाक म्हणजे तुझ्यावरचा बहिष्कार उठेल.'

गांधीजींचा असल्या खुळांवर विश्वास नव्हता. ते म्हणाले, 'भाईसाहेब, त्याला काही अर्थ नाही. मला जातीने स्वीकृत करावे म्हणून कशाला एवढी खटपट करता ? मीच जमातीच्या कामापासून दूर राहीन म्हणजे झालं.'

या बहिष्कारामुळे गांधीजींना आपल्या बहिणीचे व श्वशुरांचे घर वर्ज्य करावे लागले.

गांधीजींच्या विलायती राहणीचा प्रभाव इथे घरी परतल्या-वरही पडल्याशिवाय राहिला नाही. जेवणासाठी थाळ्या जाऊन चिनी मातीच्या डिशेस आल्या. कोको, दलिया हे जिन्नस प्रतिष्ठित झाले. शाकाहारी भोजनात इंग्रजी ढंग उतरला. घरच्या कोणाला ते आवडत नसे, पण 'फॉरिन रिटर्न' गांधीजींना भिऊन सारे चुपचाप बसत; परंतु हे देखील गांधीजींच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यांना पुढे हे देखील कळून चुकले की, एक कटोराभर गुजराती डाळीपुढे हे सर्व प्रयोग फिके आहेत. व्यर्थ आहेत !

जी गोष्ट आहाराची, तीच पोशाखाची. सुरवातीला बूट घालणे म्हणजे एक शिक्षाच असे ज्या गांधीजींना वाटे, त्यांनाच आता बूट व इंग्रजी धर्तीचा सूट प्रिय बनला होता.

ते सूटबूट वापरीतच, पण इतरांनीही वापरावा असा आग्रह धरीत असत. यामुळे घरातला खर्च वाढला आणि अद्याप मिळकत काहीच नव्हती. बॅरिस्टरीचे सर्टिफिकेट होते, पण अनुभव नव्हता. तथापि, काही तरी करणे भागच होते. विचारांती ठरले की काही दिवस मुंबईला जावे. तेथे भारतीय कायद्यांचा अभ्यास करावा. हायकोर्टाशीही तेथे संबंध येईल. अनुभव मिळेल, मग परत गावी येऊन वकिली करावी.

गांधीजी मुंबईत दाखल झाले. एका भाड्याच्या घरात ते, रविशंकर नावाच्या ब्राह्मण आचाऱ्यासह राहू लागले. पण हा रविशंकर कमालीचा अस्वच्छ व आळशी होता. तो काही करत नसे. त्याला स्वयंपाकही येत नव्हता. त्याला शिकवण्या-समजवण्यातच गांधीजींचा वेळ जाई. शिवाय तेथल्या वास्त-व्याचा विशेष काही फायदा होईलसे त्यांना वाटेना. म्हणून पाच महिन्यांनंतर ते परत राजकोटला आले आणि तेथेच त्यांनी आपली वकिली सुरू केली.

सुरुवात बरी झाली होती. बंधूंचे मित्र ओळखीने काम मिळवून देत असत. हळूहळू कमाई बरी होऊ लागली.

दरम्यान, विचित्र अनुभवात भर घालणारी एक घटना घडली.

पोरबंदर येथे बंधू एका अधिकाराच्या जागेवर काम करीत होते. एक सज्जन म्हणून त्यांना सारेच ओळखत. परंतु एका मत्सरग्रस्त माणसाने उगाचच त्यांच्यावर खोटा आरोप ठेवला. हे प्रकरण एका इंग्रज अधिकाऱ्यापुढे गेले. हा अधिकारी

गांधीजींच्या परिचयातला होता. इंग्लंडमध्येच हा परिचय झाला होता. म्हणून बंधूंनी गांधीजींना म्हटले, " मी निर्दोषी आहे. तुझ्या या इंग्रज मित्राला भेटून सांग."

खरे तर याचा काही उपयोग होणार नाही याची गांधीजींना कल्पना होती. परंतु बंधूंच्या आग्रहावरून ते त्या इंग्रज अधिकारी मित्राला भेटायला गेले. आपला परिचय दिला आणि बंधूंवरील आरोपाचा उल्लेख केला. परंतु गांधीजींचे त्याबाबतीतले म्हणणे नीट ऐकून न घेताच तो अधिकारी ओरडला, " चांगले ओळखतो आपल्या बंधूंना. मला काही एक ऐकायचे नाही. मला वेळ नाही. आपण जा." आणि इतकेच नव्हे तर चपराशाला बोलावून त्याने गांधीजींना बाहेर हाकलून लावले. दरवाजा बंद करून घेतला !

परकीय अधिकाऱ्याच्या उन्मत्तपणाची गांधीजींना चीड आली. अशा तऱ्हेच्या हजारो घटना त्यावेळी भारतात घडत होत्या. या अपमानाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध दाद कुठे मागायची ? गांधीजी अस्वस्थ बनले. न्यायपद्धतीवरचा त्यांचा विश्वास डळमळू लागला. वकिलीच्या पेशावरही त्यांचे मन लागेना.

त्याच सुमारास, बंधूंकडे एका मोठ्या व्यापाराकडून पत्र आले होते. त्यात म्हटले होते, ' दक्षिण आफ्रिकेत आमच्या कंपनीच्या खटल्याचे काम पाहण्यासाठी आपले बॅरिस्टर बंधू जातील काय ?

बंधूंनी गांधीजींना विचारले. गांधीजींनी तत्काळ संमती दिली. त्यांचे अशांत मन काहीसे स्थिरावले.

# दक्षिण आफ्रिकेत

इंग्रज लोक सभ्य व सुसंस्कृत असतात अशी गांधीजींची श्रद्धा होती. परंतु त्या इंग्रज अधिकाऱ्याच्या वर्तनाने त्यांना दुःख झाले. पण ही केवळ सुरुवात होती; कारण त्याहूनही वाईट अनुभव त्यांना पुढे आफ्रिकेत आले.

दरबान बंदरात बोट थांबली. ज्यांच्याकडे काम करावयाचे होते ते दादा अब्दुल्ला गांधीजींच्या स्वागतासाठी आले होते. पण त्यांच्याशी व इतर हिंदी लोकांशी गोरे इंग्रज कसे उद्दामपणाने वागतात हे चटकन् गांधीजींच्या लक्षात आले. हिंदी लोकांना तुच्छ मानून घृणास्पद वागणूक तेथे मिळत होती. याबद्दल गांधीजींनी चौकशी केली तेव्हा दादा अब्दुल्ला म्हणाले,

" व्यापारधंद्यासाठी येथे निमूटपणाने राहायचे असेल तर आम्हाला गाढवाची सहनशीलता अंगी बाणवली पाहिजे. पदोपदी आम्हाला अपमान सहन करावे लागतात. आपल्यालाही या गोष्टींचा अनुभव लवकरच येईल. "

आणि तसेच घडले.

दादा अब्दुल्लांच्या बरोबर गांधीजी एकदा कोर्टात गेले. गांधीजींनी अचकन व साफा असा वेष केला होता. त्यांच्या डोक्यावरचा साफा तेथील न्यायाधीशमहाराजांना आवडला नाही. ते म्हणाले,

" डोक्यावरचा साफा काढून घ्या, नाहीतर कोर्टाच्या बाहेर जा. "

गांधीजींनी उठून बाहेर येणे पसंत केले, त्यांना हा अपमान वाटला. ते दादा अब्दुल्लाना म्हणाले,

" माझ्या साफ्याशी त्यांना काय करायचे होते ? "

" त्याला काहीच अर्थ नाही. " अब्दुल्ला म्हणाले, हिंदुस्तानातील लोकांना 'कुली' समजण्यात येते, आणि इकडे कुलीचा अर्थ प्रामाणिक, इमानदार मजूर असा नाही, तर हीन, नीच व्यक्तीला 'कुली' म्हणतात. हिंदूंना सरकारी कचेऱ्यांतून साफा वापरण्यास मनाई आहे. " हे ऐकून गांधीजींना वेदना झाल्या. रागही आला. " असं, मग या बाबतीत काहीच करत नाही तुम्ही ? " गांधीजी म्हणाले. अब्दुल्ला गप्प राहिले. गांधीजीच पुढे म्हणाले, " मी वृत्तपत्रांत याविरुद्ध तक्रार करीन. हरेक हिंदी माणसाला न्याय मिळालाच पाहिजे. भिऊन भागणार नाही. भ्यालो तर प्रगती कशी करणार आपण ? "

गांधीजींनी वृत्तपत्रांच्या वेशीवर या अन्यायांना वाचा फोडली. ते वाचून गोरे लोक खूपच चिडले. संतापले. ते म्हणू लागले, " हा गांधी आम्हांला येथे नकोच. जेथून आला तेथे त्याला परत पाठवला पाहिजे. "

गोरे चिडले, पण हिंदी बांधवांना धीर मिळाला; त्यांना गांधींविषयी आदर उत्पन्न झाला व ते गांधीजींना साहाय्य

करायला पुढे आले. काही सभ्य व समजूतदार इंग्रजांनीही गांधीजींना साथ दिली.

एकदा गांधीजी दरबानहून प्रिटोरियाला चालले होते. पहिल्या वर्गाचे तिकिट काढून प्रवास करीत होते. मध्यरात्रीची वेळ, मरित्सबर्गला गाडी पोचली. त्यावेळी आणखी एक गोरा प्रवासी डब्यात चढला. गांधीजींना पाहताच त्याचे डोळे लाल झाले. तो रागाने तसाच तडक रेल्वे अधिकाऱ्याकडे गेला व त्याला घेऊन आला. मग दोघांनीही गांधीजींवर शिव्यांची सरबत्ती सुरू केली. गांधीजींच्या लक्षात येईना की हे कशा-करिता ? शेवटी तो रेल्वे अधिकारी त्यांना दरडावून म्हणाला "ऊठ येथून, थर्ड क्लासमध्ये जाऊन बैस." "माफ करा. माझ्याजवळ फर्स्ट क्लासचे तिकीट आहे" गांधीजींनी शांतपणे सांगितले. पण तो अधिकारी तार स्वरातच म्हणाला, "असूदे, पण तुमच्यासारख्या लोकांना सज्जन माणसांबरोबर प्रवास करता येणार नाही. ऊठ येथून."

आता गांधीजींच्या लक्षात आले. वर्ण-भेदाचा हा प्रकार आहे ! ते काळे होते ना !

गांधीजींनी शांतपणाने सांगितले, "मी येथून उठणार नाही; कारण माझ्याजवळ प्रथमवर्गाचे तिकीट आहे. ते काढताना कुणी मला विरोध केला नाही."

गांधीजी हलत नाहीसे पाहून त्याने पोलिसाला बोलावले. पोलिसाने जबरदस्तीने गांधीजींना डब्याबाहेर काढले.

डब्यातल्या गोऱ्यांनी त्यांचे सामान खिडकीतून बाहेर प्लॅट-फॉर्मवर भिरकावले.

गाडी पुढे निघून गेली. गांधीजींनी सारी रात्र तेथेच थंडीत कुडकुडत, या अन्यायाला तोंड कसे द्यावे याचा विचार करीत काढली.

एकदा वाटले, 'जावे झाले परत हिंदुस्तानात. कशाला ह्या कटकटी.' पण त्यांचे न्यायी मन उसळून उठले. 'छे ! छे ! परत जाणे हा भ्याडपणा आहे. हिंमतपूर्वक ह्या अन्यायाविरुद्ध लढले पाहिजे आणि आपल्या देशबंधूंना न्याय मिळवून दिला पाहिजे. त्यासाठी, हे अपमानही आज सहन केले पाहिजेत.'

संध्याकाळी त्यांनी चार्लसटाऊनला जाणारी गाडी पकडली. तेथून जोहान्सबर्गला जाण्यासाठी घोडागाडीची व्यवस्था होती. गांधीजींनी तिकीट दाखवले तेव्हा त्यांना गाडीवानाजवळ बसण्यास सांगितले. वास्तविक गाडीत बसण्याचा त्यांना अधिकार होता. पण हिंदी आदमी ! वर्णभेद !

गांधीजींनी हाही अपमान गिळून गाडीवानाजवळ जागा धरली. गाडी चालू लागली. काही वेळानंतर एके ठिकाणी घोडे बदलण्यासाठी गाडी थांबली. तेवढ्यात एक तिकीट चेकर आला नि गांधीजींना ढकलून आपण त्यांच्या जागेवर बसून गाडीवानाशी गप्पा झोडू लागला. या काळ्या आदमीने आपल्या पायाशी बसले पाहिजे ही त्याची उर्मट इच्छा !

गांधीजींना हे सहन झाले नाही. आपली जागा सोडण्यास त्यांनी शांतपणाने नकार दिला, तेव्हा त्या गृहस्थाने

गांधीजींना गाडीच्या खाली ओढायला सुरुवात केली. त्यांना थपडाही मारल्या. गांधीजींनी शांत राहून काही एक न बोलता गाडी हाताने पक्की धरून ठेवली. तिकीट चेकरचे ओरडणे, अपशब्द व मारझोड सुरूच होती. ते पाहून बाकीचे प्रवासी धाऊन आले. त्यांनी त्या चेकरला बाजूला केले. तोही आता मारपीट करून थकलेला होता. गाडीवानाच्या दुसऱ्या बाजूला एका हबशी प्रवाशाने त्याला बसायला जागा दिली. गाडी पुढे चालू लागली. वाटेत, वाटेल तसे अपशब्द तो गांधीजींना ऐकवीत होता.

गांधीजींनी हे सारे मोठ्या धैर्याने व शांतीने सहन केले; कारण याहून अधिक मोठ्या साहसाचे काम त्यांना पुढे करावयाचे होते. आजच्या रागाने, उलट उत्तराने त्यात बाधा आली असती. बुद्धाची व येशूची शिकवण त्यांनी दृष्टीपुढे ठेवली होती.

ठिकठिकाणी हिंदी लोक येऊन गांधीजींच्या कानी आपले हाल, अपमान घालीत होते. गोरे लोक हिंदी लोकांना कशी तुच्छतेची वागणूक देत होते, त्यांना कसे अपशब्द वापरीत होते हे सारे ऐकून, पाहून आणि अनुभवून गांधीजींना दुःख होई. ते बेचैन बनत. अस्वस्थ होऊन जात.

जोहान्सबर्ग हे मोठे शहर आहे. अनेक मोठमोठी हॉटेल्स रहाण्याजेवण्यासाठी, तेथे त्यावेळी देखील होती. जोहान्स-बर्गला पोहोचल्यावर गांधीजी हॉटेलामधून कुठे रिकामी खोली मिळते का याचा शोध घेत खूप हिंडले. पण जेथे ते जात

तेथे त्यांच्याशी धड कोणी बोलत नसे. नीट उत्तरे देत नसत आणि अत्यंत तुच्छतादर्शक नजरेने पाहिले जाई. कोणीही गांधीजींना जागा दिली नाही. कारण ते ‘ काळे ’ होते.

शेवटी, हिंडून हिंडून नाइलाज झाल्यावर गांधीजी आपल्या हिंदी मित्राकडे उतरायला गेले. गांधीजींना गोऱ्यांची ही दुष्ट वागणूक पाहून क्लेश झाले. मित्रानेही अनेक तऱ्हेच्या अन्यायाच्या, अपमानाच्या, उपेक्षेच्या कथा ऐकवल्या. माणसांनी माणसांशी अशा तऱ्हेचे माणुसकी विसरून वर्तन करावे याला काय सभ्यता म्हणायची की सुशिक्षितपणा ? हा तर पशुतुल्य रानटीपणा होता ! माणुसकीला कलंक होता.

आणखी एकदा प्रिटोरियाच्या गाडीने प्रवास करण्याचा प्रसंग आला. गांधीजींनी याही वेळी जिद्दीने प्रथमवर्गाचे तिकीट काढले व त्या वर्गात बसले. काही वेळाने तिकीटचेकर आला. गांधीजींना पाहून तो संतापला आणि उद्धटपणाने म्हणाला,

“ ऊठ येथून. तिसऱ्या वर्गात जाऊन बैस. ”

“ मी हलणार नाही. माझं तिकीट याच वर्गाचं आहे ” गांधीजींनी धैर्याने सांगितले.

“ पण मी सांगतोय तुला, तू तिकडे बैस. ”

गांधीजी हलले नाहीत व त्यांनी शांतीही ढळू दिली नाही. याचा परिणाम दुसऱ्या एका गोऱ्या प्रवाशावर चांगला झाला. तो त्या चेकरला म्हणाला,

“ बसू दे यांना इथं. ते म्हणताहेत ते बरोबर आहे. त्यांचं

तिकीट याच वर्गाचं आहे. शिवाय त्यांच्यापासून मला बिलकूल त्रास होत नाही. ”

हे स्वकीयाचेच उद्‌गार ऐकून चेकरसाहेब हताश झाले. आणि गुपचूप निघून गेले.

दादा अब्दुल्लांच्या खटल्यासाठी गांधीजींना वर्षभर प्रिटोरियामध्ये रहावे लागले. तेथे त्यांना एक प्रेमळ म्हातारी भेटली. तिने गांधीजींना आपल्या घरातली एक खोली राहण्यास दिली.

गांधीजींनी वकिलीच्या कामात सत्यता व प्रामाणिकपणा याच गुणांचा पुरस्कार केला. आपल्यापुढील खटल्याचा सर्व दृष्टीने अभ्यास केला, आपल्या अशिलाशी बोलणे केले. आणि दोघांत समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यास यश मिळाले. वर्षानंतर समझोता झाला. दोन्ही पक्षांचे कल्याण झाले. नाहीतर भांडणात कोर्टकचेरीच्या पायी दोघांचेही दिवाळे निघण्याची वेळ आली असती ! आणि वकिलांची पोळी पिकली असती. पण गांधीजींनी आपल्या व्यक्तिगत स्वार्थाची पर्वा न्यायापुढे कधीच केली नाही. सत्याची आणि न्यायाची प्रतिष्ठा त्यांनी सदैव प्राणपणाने सांभाळली.

# अन्यायाशी दोन हात

ज्या कामासाठी गांधीजी आफ्रिकेत आले होते, ते अब्दुल्ला शेटजींचे काम संपले. गांधीजींनी हिंदुस्तानात परत जाण्याची तयारी चालविली. अब्दुल्लांनी गांधीजींना निरोप देण्यासाठी एक समारंभ योजिला. समारंभास पुष्कळ हिंदी मित्र, व्यापारी, नागरिक हजर राहिले. तेथेच एकाने गांधीजींच्या हाती एक वृत्तपत्र दिले. त्यात प्रसिद्ध झाले होते की, हिंदी लोकांना असलेले मूठभर अधिकारही नाताळ सरकार एका नवीन कायद्यान्वये हिरावून घेणार आहे!

या वार्तेने हिंदी लोकांत खळबळ माजणे स्वाभाविकच होते. सध्या होत असलेल्या अन्यायाचे परिमार्जन तर नाहीच पण उलट आणखी दडपशाहीचा वरवंटा नाताळ सरकार फिरविणार होते. लोकांत घबराट निर्माण झाली. त्यांनी गांधीजींना तेथेच राहण्याची विनंती केली. गांधीजींनी आपला बेत बदलला.

नव्याने होणारा कायदा अन्यायमूलक आहे, तेव्हा तो करण्याची घाई करू नये अशी तार गांधीजींनी नाताळ सरकारला केली. हिंदी–गोऱ्यांच्या लढ्यात एक नवीन पर्व सुरू होत होते. आपल्या हक्कांची जपणूक करण्यासाठी टाकलेले हे महत्त्वाचे पहिले पाऊल होते.

नाताळ सरकारशी हक्कासाठी सनदशीरपणाने झगडायचे तर सर्व हिंदी लोकांनी एकत्र येऊन आपले सामर्थ्य निर्माण करणे व वाढविणे आवश्यक होते. गांधीजी हिंदी बांधवांची संघटना उभी करण्याच्या कामी लागले. ठिकठिकाणी त्यांनी हिंदी लोकांच्या सभा घेतल्या. आपल्या हक्कांबरोबर कर्तव्याचीही जाणीव ते लोकांना करून द्यायला विसरत नसत. एकदा व्यापाऱ्यांच्या सभेत बोलताना ते म्हणाले,

"व्यापारामध्ये प्रामाणिकपणाने वागता येत नाही, इमानदारीने राहणे अशक्य आहे असे जे तुम्ही समजता ते चुकीचे आहे. व्यापारातही सच्चेपणा पाहिजे. व्यापारधंदा असो, नोकरीचाकरी असो की तत्त्वज्ञान, राजकारण, शिक्षण, कोणतेही क्षेत्र असो. हरेक रस्ता परमेश्वराजवळ जाऊनच पोचतो. एका उंच, अजस्त्र पर्वतासारखे जीवन आहे. साहस एकवटून, परिश्रम करून आपण त्यावर चढण्याचा प्रयत्न करीत असतो. प्रत्येकजण आपापला मार्ग निवडीत असतो.

तत्त्वज्ञ, व्यापारी, भिक्षू, साधू, राजनीतिज्ञ इत्यादी सर्वजणच आपल्या वाटचालीत मनात म्हणत असतील की, आपला हाच मार्ग ध्येयबिंदूपर्यंत नेण्यास समर्थ आहे. माझाच रस्ता बरोबर आहे. केवळ मलाच मुक्ती लाभणार !

तथापी, यांपैकी जे कोणी वाटेतच न थांबता न थकता भागता, ठेचा खात, काटेकुटे तुडवीत दृढ निश्चयाने शिखर

गाठतात तेव्हा त्यांना तेथून काय दिसते? निरनिराळे आणखी रस्ते आणि ते चढून येणारे आणखी विविध लोक!

तेव्हा सांगायचा उद्देश असा की, प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक व्यवसाय-द्वारा आपल्या निष्ठापूर्वक, श्रद्धायुक्त वाटचालीने मुक्ती मिळवू शकते.

मित्रांनो, आपण सगळे एकमेकांचे साथी आहोत. आपले ध्येय एक आहे. म्हणून आपणातले धर्म, जाती व वर्णभेद विसरून गेले पाहिजे आणि एक बळकट संघटना उभारली पाहिजे. एकमेकांना मदत करू, एकमेकांच्या हक्कांचे रक्षण करू.

जेथे कोठे अन्याय घडेल, अत्याचार होईल, तेथे आपले सदस्य जबाबदार लोकांपुढे जाऊन तक्रार नोंदवतील. दुःखाला वाचा फोडतील. अशा प्रकारे हळू हळू गोऱ्या लोकांनाही आपल्या परिस्थितीची कल्पना येईल.

गांधीजींचे विचार लोकांना पटले. त्यांनी संमती दिली आणि १८९४ सालच्या मे महिन्यात 'नाताळ इंडियन काँग्रेस' या संस्थेची स्थापना गांधीजींनी केली.

अन्यायाविरुद्ध झगडणे हे जरी या संस्थेचे मुख्य काम असले तरी त्यातही गांधीजींनी एक सनदशीर, शांततेची वाट दाखवून दिली. दर आठवड्याला संस्थेची बैठक होई. विविध प्रश्नांवर समग्रपणे चर्चा होई व निर्णय केला जाई. गांधीजींनी आपल्या कार्यकर्त्यांना संयम, सत्य, शांती यांची

महती पटवली. भडक अतिशयोक्ती व पुराव्याशिवायच्या गोष्टीपासून दूर राहणे, गोऱ्यांच्या म्हणण्यात तथ्य असले तर ते मान्य करणे, स्वतःच्या चुकांची प्रांजळपणे कबुली देणे, समानतेच्या भूमिकेवरून स्वाभिमानपूर्वक गोऱ्यांशी योग्य ठिकाणी सहकार्य करणे आदी गोष्टीही गांधीजींनी शिकविल्या. त्यामुळे त्यांच्या संघटनेला नैतिक बळ लाभले.

वर्तमानपत्रात लेख लिहून प्रचाराची आघाडी उघडण्यात आली. खोट्यानाट्या आरोपांना उत्तरे दिली जाऊ लागली. याचा परिणाम, हळूहळू संस्थेने गुदरलेल्या तक्रारींना न्याय मिळू लागला.

पहिल्या प्रथम रेल्वे कंपनीला लिहिले. कंपनीने त्वरित कळवले, "यापुढे प्रत्येक हिंदी माणसाला अन्य लोकांप्रमाणे पहिल्या व दुसऱ्या वर्गातूनही प्रवास करता येईल, मात्र त्यांनी सभ्य वेषात असावे."

रात्री नवाच्या पुढे शहरात हिंडण्यास हिंदी लोकांना परवाना लागे. पण संस्थेने या बाबतीतही खटपट केली नि ही अन्यायी अट काढून टाकण्यात यश मिळविले.

एकदा तर खुद्द गांधीजींनाच याचा प्रसाद मिळाला. त्याचे असे झाले : गांधीजी फिरत फिरत गव्हर्नरसाहेबांच्या बंगल्या-कडे गेले. तिकडे फिरण्यास मनाई होती. गांधीजींना पण याची कल्पनाही नव्हती. एकाएकी एका पोलिसाने त्यांना धरले, उचलले आणि जवळच्याच गटारात फेकून दिले. त्याच वेळी

गांधीजींच्या एका मित्राने जाताना हे दृश्य पाहिले. आणि त्यांना वर काढले. घरी पोचवले.

मित्र म्हणाला, "आपण याविरुद्ध तक्रार करा."

गांधीजी म्हणाले, "छे! छे! वैयक्तिक अडचणींच्या विरुद्ध मी तक्रार करणार नाही."

गांधीजी लढत होते ते स्वतःच्या लाभासाठी नव्हे, तर आपल्या दुःखी हिंदी बांधवांना येथे न्यायाची व प्रेमाची वागणूक मिळावी, यासाठी द्वेष आणि मत्सर ही गांधीजींची वाट नव्हती; तर प्रेम, न्याय, सत्य हा त्यांचा राजमार्ग होता.

आणखी एक वर्ष उलटले आणि गांधीजी मातृभूमीला परतले. दक्षिण आफ्रिकेतल्या परिस्थितीसंबंधी स्वाभाविक उत्सुकतेनेच येथे त्यांना लोकांनी विचारले आणि गांधीजींनीही सत्य परिस्थिती निवेदन केली. वृत्तपत्रांत या गोष्टी छापून आल्या आणि त्यामुळे आफ्रिकेतले गोरे अधिकच लालीलाल झाले.

याच सुमारास गांधीजींना 'आफ्रिकेत ताबडतोब निघून या' अशी अब्दुल्लांची तार मिळाली. आणि पत्नी कस्तुरबा व लहानगा मुलगा यांना घेऊन गांधीजी बोटीने आफ्रिकेस दुसऱ्यांदा निघाले. त्याच बोटीने आणखी अन्य पाच-सहाशे भारतीय तिकडे निघालेले होते.

गांधीजी व इतके हिंदी लोक येताहेत हे ऐकून आफ्रिके-तल्या गोऱ्यांना आणखीनच संताप आला. त्यांना वाटले की गांधीजी आपल्यावर हल्ला करण्यासाठीच येत आहेत. त्यांनी

निश्चय केला की, गांधीजींना व या त्यांच्या बरोबरच्या लोकांना आफ्रिकेच्या किनाऱ्यावर पाय ठेवू द्यायचा नाही. आपल्या सरकारकडेही त्यांनी खोटी वार्ता दिली की हिंदुस्तानात प्लेग सुरु आहे तेव्हा या लोकांना बंदरात उतरायला मनाई करावी.

सरकारनेही संपूर्ण चौकशी न करताच बोट समुद्रातच थांबवायचा हुकूम दिला. दरबानच्या बंदरापुढे समुद्रात तीन आठवडे बोट उभी करायला लावून सरकारने मोठाच अन्याय केला. बोटीवर एकही रोगी नव्हता.

शेवटी तीन आठवड्यांनंतर बंदरावर उतरण्याची परवानगी मिळाली. पण गोऱ्या लोकांनी धमकी दिली, "पाय तर ठेवा बंदरात, समुद्रातच फेकून देऊ एकेकाला."

वातावरण तंग बनले. शेवटी सरकारने गोऱ्यांना आश्वासन दिले की, हिंदी लोकांना इकडे येण्यास मनाई करणारा कायदाच आम्ही करू.

या आश्वासनाने गोरे शांत झाले. हिंदी प्रवासी बंदरात उतरले. गांधीजी त्यांच्याच बरोबर उतरू लागले तेव्हा पोलीस सुपरिंटेण्डेन्टने त्यांना सूचना केली की, आपण रात्री अंधार पडल्यावर उतरावे. गोरे लोक आपल्यावर फार रागावलेले आहेत आणि त्यामुळे आपल्या जीवास धोका पोहोचण्याचाही संभव आहे.

परंतु गांधीजींनी हा सल्ला मानला नाही. ते आपला साफा चढवून उतरले. आपल्या एका मित्राच्या घरी जाण्यास

निघाले. सायंकाळची वेळ होती आणि जवळच काही मुले खेळत होती. त्यांनी गांधीजींना ओळखताच ती ओरडू लागली, " अरे गांधी आला गांधी आला. हाणा, दगड मारा चला. "

गांधीजींवर दगडांचा वर्षाव सुरू झाला. तेवढ्यात मोठी माणसेही गोळा झाली आणि त्यांनीही गांधीजींना मारण्यास सुरुवात केली. एका दांडग्या माणसाने गांधीजींच्या डोक्यावरचा साफा घेऊन चिखलात फेकला. शिव्यांची लाखोली सुरूच होती.

भयंकर माराने गांधीजींचे अंग ठणकू लागले. त्यांना भोवळ आली. ते खाली कोसळणार तेवढ्यात एका महिलेने येऊन त्यांना सावरले. आपली छत्री उघडून आडोसा केला नि दगडविटांचा मारा थोपवून धरला. त्या होत्या मॅडम अलेक्झांडर. पोलीस सुपरिंटेंडेंटच्या पत्नी. मग लोकही पांगले. मॅडमनी गांधीजींना त्यांच्या मित्राच्या घरी पोचविले.

पण नंतर आणखी काही अधिकाऱ्यांनी त्या मित्राच्या घरापुढेच धरणे धरले. दरवाजा ठोठावीत ओरडू लागले, " गांधी कुठाय् ? त्याला बाहेर काढा ! "

तेवढ्यात खुद्द पोलीस सुपरिंटेंडेंट तेथे आले. त्यांनी गांधीजींना वाचविण्याचे ठरविले आणि मग युक्तीने ते गोऱ्यांच्या जमावापुढे चालू लागले. गांधीजींची निंदा नालस्ती करणारे गाणे गाऊ लागले. लोक त्यांच्या नादी लागले,

असे पाहून एका पोलीसाने घरात जाऊन त्यांची भेट घेतली आणि पोलिसाचा वेष करून ठाण्यावर चलण्याची विनंती केली. बाहेर एक गाडीही तयार ठेवली होती. गांधींनी परिस्थिती लक्षात घेतली. आपण गेलो नाहीतर लोक मित्राचे हे घर जाळून टाकतील, त्याला त्रास होईल, असा विचार करून त्यांनी वेष बदलून तेथून निसटण्यास संमती दिली.

तिकडे गांधीजी सुखरूप ठाण्यावर पोचल्यावर सुपरिंटेंडेंट साहेबांनी इकडे त्या अशांत लोकांना सांगितले, " गांधी या घरात नाहीत, पोलीसठाण्यावर आहेत. उगाच का गोंधळ करताहात ? "

लोकांना हे खोटे वाटले, " पण त्यांच्यापैकी एकदोघांनी त्या घरात जाऊन खात्री करून घेतली. तेव्हा निराश होऊन लोक परतले.

या घटनेविषयी एका पत्रकाराला गांधीजींनी सांगितले,


" या युरोपियन लोकांचा काहीतरी गैरसमज झालेला आहे. माझ्याबरोबर आलेले लोक येथेच कित्येक दिवसांपासून स्थाईक झालेले व्यापारी वगैरे आहेत. सुटीत मायदेशी जाऊन ते परतले आहेत. आफ्रिकेवर हल्ला करण्यासाठी कोणीही आलेला नाही. "

दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात हा खुलासा वाचल्यानंतर बऱ्याच समजदार गोऱ्यांना आपली चूक उमगून आली. या घटनेची वार्ता इंग्लंडमध्येही पोचली. तेव्हा ब्रिटिश सरकारने

गांधीजींवर हल्ला करणाऱ्यांवर खटले भरण्याचे फर्मान आपल्या तेथील अधिकाऱ्यांकडे धाडले. त्यानुसार नाताळच्या सरन्यायाधिशांनी गांधीजींना बोलावून घेऊन सांगितले, "आपण आपली फिर्याद द्यावी. मी यथोचित न्यायासाठी खटपट करीन."

गांधीजी म्हणाले, "या जिव्हाळ्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु मला कोणाविरुद्ध काही करावयाचे नाही. सत्य कळल्यावर त्यांना पश्चाताप होईल."

गांधीजींची क्षमा उदंड होती. त्यांना हेही ठाऊक होते की, लोक सारासार विचार न करताच भडकून जात असतात. भडकविणारे त्यांचे नेते खरे दोषी असतात.



# नवी वाटचाल

सद्‌हेतूने प्रेरित होऊन केलेले कार्य जाणत्यांना आकर्षित केल्याशिवाय राहात नाही. नाताळमध्ये गांधीजींना पुष्कळसे इंग्रज मित्रही लाभले. त्यांचा चांगला स्नेह लोभ जमला. काही काळानंतर तर त्यांच्यापैकी काहीजण गांधीजींचे सहकारी बनले आणि संकटकाळीही त्यांनी गांधीजींची पाठ सोडली नाही.

गांधीजी या आपल्या मित्रांना कधी कधी विचारीत, “ इथले इंग्रज हिंदी लोकांना कशासाठी पाण्यात पाहातात ? त्यांना का नाही सामावून घेत ? ” मित्र म्हणत, “ गांधीजी, हिंदी लोक येथे आले आहेत ते केवळ पैसा कमावण्यासाठी. त्यांना इंग्रजांविषयी साहानुभूती नाही. ”

“ ही चुकीची समजूत आहे ” गांधीजी त्यांना सांगत, “इंग्रजांवर जर संकट आले तर माझे देशबांधव स्वस्थ राहातील असे मला वाटत नाही. इंग्रजांच्या खांद्याला खांदा लावून ते लढतील याची मला पूर्ण खात्री आहे. ”

परंतु गांधीजींच्या या उद्‌गारावर त्यांचा त्यावेळी तरी विश्वास बसत नसे.

पुढे काही दिवसांनी दक्षिण आफ्रिकेतील रहिवाश्यांमध्येच युद्धाची ठिणगी पडली. त्याला ‘ बोअर वॉर ’ म्हणतात.

दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या डच लोकांना बोअर म्हणतात. त्यांना ब्रिटिशांचे वर्चस्व नको होते. आणि त्या संघर्षातूनच बोअर युद्ध पेटले होते. बोअर लोकांनी मोठीच मर्दुमकी गाजवून इंग्रजांना भयभीत केले होते.

ज्यांच्या साम्राज्यात आपण राहातो त्यांना त्यांच्या संकट-काळी मदत करणे आपले कर्तव्य आहे या भावनेने गांधीजींनी आपल्या देशबांधवांना मदतीसाठी हाक दिली आणि रणांगणा-वरील जखमी सैनिकांसाठी एक शुश्रूषा पथक उभारले. बाराशे भारतीय या पथकात दाखल झाले. त्यात व्यापारी होते, शेतकरी होते, मजूरही होते.

या पथकातील स्वयंसेवकांना अनेक तऱ्हेच्या आपत्तींना त्यावेळी तोंड द्यावे लागले. जखमी सैनिकांना खांद्यावरून तीस तीस मैल त्यांना न्यावे लागले. जीव धोक्यात घालून माऱ्याच्या जागी जावे लागे.

हिंदी लोक निर्भय, शूर आणि स्वामिनिष्ठ आहेत, हेच गांधीजींना दाखवून द्यावयाचे होते आणि आपल्या अंगच्या असामान्य धैर्याने त्यांनी अपार कष्ट करून ते सिद्ध करून दाखविले.

या काळात हिंदी लोकांशी इंग्रज लोकही चांगले वागले. हिंदी लोकांनाही एक उत्तम अनुभव मिळाला. हिंदी स्वयं-सेवकांच्या कामगिरीची प्रशंसा सर्व वृत्तपत्रांनी केली, ब्रिटिश सरकारनेही धन्यवाद दिले.

बोअर युद्ध संपले आणि गांधीजी भारतात यावयास निघाले. आफ्रिकेतल्या मित्रांना त्यांनी आश्वासन दिले की 'तुम्ही बोलवाल तेव्हा येईन.'

गांधीजींना भारतीयांतर्फे निरोप देण्याचा समारंभ झाला. गांधीजींच्यामुळे त्यांना थोडी प्रतिष्ठा मिळू लागली होती. अन्ययाची धार कमी झाली होती. गांधीजींच्या विषयी प्रत्येकाला प्रेम व आदर वाटणे स्वाभाविक होते. गांधीजी मायदेशी जाणार म्हणून अनेकांनी अनेक प्रकारच्या मौल्यवान वस्तूंची भेट देऊन आपला आदर व्यक्त केला. सोन्या चांदीच्या व भारी रत्नांच्या त्या वस्तू आणि त्यामागचे प्रेम पाहून गांधीजींनाही कृतज्ञता वाटली. परंतु त्यांनी येताना प्रेम तेवढे स्वीकारले. त्या मौलिक वस्तू तेथेच, हिंदी बांधवांच्या कल्याणकारी कामासाठी ठेवून ते परतले. 'सार्वजनिक कार्य कर्त्याने देणग्यांचा स्वतःसाठी कधीही स्वीकार करू नये,' असे गांधीजींचे मत होते.

ज्यावेळी गांधीजी हिंदुस्थानात आले त्यावेळी हिंदुस्तानच्या राजकीय क्षितिजावरही चैतन्यपूर्ण घडामोडी घडत होत्या. नामदार गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, फिरोजशहा मेथा आदी नेते राष्ट्राची धुरा वाहत होते. त्या सालच्या कलकत्त्याच्या काँग्रेसला गांधीजी हजर राहिले. सफाई पथकात स्वयंसेवक बनले. गोखले, टिळक, मेथा आदि नेत्यांशी परिचय वाढला. गोखल्यांच्या मृदू व्यक्तित्वाची आणि उदात्त विचारांची छाप गांधीजींवर विशेष पडली.

'गोखले मला गंगोदकाप्रमाणे वाटले' असे गांधीजींनी म्हटले आहे. कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्ये गांधीजींनी आफ्रिकेतील परिस्थितीसंबंधी ठराव मांडला. या कामी गोखल्यांनीच त्यांना सहाय्य दिले. गांधीजींच्या आफ्रिकेतील कार्यावर गोखले खूष होते. गांधीजींना ते म्हणाले, "मुंबईत स्थाईक होऊन वकिली करा आणि माझ्या कार्यात मला सहाय्य करा."

गांधीजींनी गोखल्यांना गुरुस्थानीच मानले होते. गोखल्यांच्या म्हणण्याला त्यांनी अनुमती दर्शविली पण आफ्रिकेतील मित्रांची हाक आली. जाणे भागच होते. कारण त्यांना आश्वासन देऊन ते आले होते.

तिकडे आफ्रिकेमध्ये हिंदी लोकांच्या प्रश्नांवर पुनश्च वादळ सुरू झाले होते.

जोहान्सबर्ग येथील हिंदी लोकांची वस्ती म्हणजे दुर्गंधीचे आगर होते. तेथ रोगराईने मूळ धरले. गोऱ्यांची नगरपालिका तेथील स्वच्छतेकडे मुळीच लक्ष देत नसे. आपले कर्तव्य पार पाडीत नसे. गांधीजींनी नगरपालिकेच्या या गैर कारभाराबद्दल वृत्तपत्रांतून कडक टीका केली. याचा परिणाम तत्काळ झाला आणि नगरपालिकेने हिंदी लोकांच्या स्वास्थ्याकडे लक्ष पुरविले.

आपले प्रश्न जाहीर रीतीने चर्चिण्यासाठी व आंदोलन प्रभावी रीतीने संघटित करण्यासाठी गांधीजींनी 'इंडियन ओपिनियन' नावाचे साप्ताहिक सुरू केले. दर आठवड्याला गांधीजी या साप्ताहिकाद्वारे आपल्या देशबांधवांशी हितगुज

करू लागले. दैनंदिन जीवनातल्या अडीअडचणीप्रमाणेच, स्वच्छता व आरोग्य, स्वावलंबन, संयम, धार्मिकता इत्यादि अनेक विषयांवर ते आपले विचार प्रकट करीत असत. वाचकही पत्रे लिहून अडचणी मांडीत, सल्ला मागत, चर्चा करीत. कुठल्याही विषयावर लिहिण्यापूर्वी गांधीजी त्याचे अध्ययन, चिंतन करीत, चुकीचे मार्गदर्शन आपल्याकडून होऊ नये याबद्दल दक्ष असत. तसेच आपले विचार स्पष्टपणे मांडण्यासही ते कचरत नसत. निःपक्ष राहून सत्य तेच सांगण्याचा यत्न करीत. खोटी स्तुती किंवा अतिशयोक्ती यांचा त्यांना तिटकारा होता. परंतु परखडपणे लिहितानाही एखाद्याचे हृदय दुखावणार नाही, याची काळजी ते घेत असत.

पत्रकार हा समाजाचा शिक्षक व पथप्रदर्शक आहे. तो सत्यवचनी, निस्पृह, निर्भय व सर्वहिततत्पर असावा. स्वार्थ, लोभ, यांपासून दूर असावा. तरच त्याच्या लेखणीचा प्रभाव जनमानसावर उमटेल. अशा विचाराने गांधीजींनी आपले स्वतःचे जीवन साधे व सरळ बनविण्याचा संकल्प केला. आपल्या निर्वाहासाठी शेतीत काम करावयाचे व बाकीच्या वेळात साप्ताहिकासाठी लेखन करावयाचे त्यांनी ठरविले.

थोड्याच दिवसांत गांधीजींनी एक लहानसे शेत खरेदी केले. तेथे बरीच फळझाडे, एक लहानसे मोडकेतोडके घर व जवळच छोटासा ओढा होता. एका मित्राने घर तयार करण्यासाठी सामानाची मदत केली. गांधीजी या शेतीवर राहू लागले. त्यांनी आपल्या मित्रांनाही बोलाविले, "माझ्या

बरोबर रहा. तुमचे जीवन साधे व सुंदर बनेल. अपमानजनक व्यवहारापासून दूर रहाल आणि स्वाभिमानाने जगाल. स्वतंत्र व्हाल ! " गांधीजींनी आपल्या आश्रमाचे नाव ठेवले– ' फिनिक्स. '

या प्रयोगाची प्रेरणा गांधीजींना सुप्रसिद्ध रशियन लेखक व मोठा जमीनदार टॉल्स्टॉय याच्यापासून मिळाली होती. टॉल्स्टॉयने आपल्या सुखी व विलासी जीवनाचा त्याग करून दीन दुःखितांचे अश्रू पुसण्यात धन्य मानले होते. तो म्हणतो,

"हे विलासमय जीवन तुम्हांला सत्याकडे कधीही घेऊन जाणार नाही. म्हणून साध्यासुध्या जीवनाचा स्वीकार करा. माणसाला तेच योग्य होय."

टॉल्स्टॉयप्रमाणे गांधीजींनी आफ्रिकेच्या भूमीवर आदर्श जीवनाचा प्रयोग आरंभिला. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी एक शाळाही तेथे चालू केली. टॉल्स्टॉय सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करीत असे. दुसऱ्याला कष्ट देण्याऐवजी स्वतः ते भोगण्याची तयारी त्याने सदैव ठेवली, गांधीजींना टॉल्स्टॉयचे जीवन व विचार आदर्शवत वाटले.

फिनिक्स् आश्रमात प्रारंभी कस्तुरबा, गांधीजींची मुले व काही मित्र हेच गांधीजींचे आश्रमीय सोबती होते. दिवस_ भर शेतात काम केल्यावर ही मंडळी जेव्हा सायंकाळी एकत्र येत तेव्हा एकमेकांना गोष्टी सांगत, गाणी गात, ईश्वराची प्रार्थना करीत.

श्रमनिष्ठ, शांतीपूर्ण जीवनाने आत्मबल वाढण्यासही मदत झाली. गीतेने गांधीजींचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून टाकला. ईश्वरनिष्ठ गांधीजींनी आपल्या एका मित्राला कळवून आपला उतरलेला विमादेखील दुर्लक्षिला. गांधीजींनी लिहिले, " जो ईश्वरनिष्ठ आहे त्याने भवितव्याची चिंता वाहण्याचे कारण नाही. विमा म्हणजे ईश्वरावरील निष्ठेचा अभाव."

या आधी गांधीजी आपल्या कमाईतले उरलेले पैसे बंधूंना गावी पाठवीत असत, पण आता त्यांना वाटू लागले, हे पैसे येथे कमावले तेव्हा येथेच खर्चले पाहिजेत. येथे माझे देश-बांधव आहेतच ना ! बंधूंना त्यांनी कळवून टाकले, " माझी येथील मिळकत मी माझ्या येथल्या बांधवांच्या हितासाठीच खर्च करीन. "

टॉलस्टॉयप्रमाणेच गांधीजींना क्रांतिकारक जीवदृष्टी देणारा दुसरा 'रस्किन' हा होय. रस्किनचे 'अँटू धिस लास्ट' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले आणि गांधीजींना 'सर्वोदया'चे तत्त्वज्ञान गवसले. श्रमप्रतिष्ठा व सर्वहितबुद्धी ह्या गोष्टींचे महत्त्व त्यांना चांगले जाणवले. श्रमिकांचे–शेतकऱ्यांचे–जीवन जगण्यासाठी आणखी स्फूर्ती लाभली. गांधीजी म्हणतात, " प्रभात झाली आणि ही नवीन तत्त्वे जीवनात आणण्यासाठी मी उभा राहिलो."

गांधीजींनी याच सुमारास ब्रह्मचर्याचेही व्रत घेतले. 'ब्रह्मचर्य म्हणजे अखंड सावधानता' असे ते म्हणतात.

व्यवसायात सत्याची बूज त्यांनी राखली. मालावरची जकात चुकवून सरकारला फसविणाऱ्या रुस्तुम शेठला त्यांनी सरकारपुढे आपला गुन्हा प्रांजळपणाने कबूल करून त्याबद्दल होणारा दंड भोगण्याचा सल्ला दिला.

गांधीजींचे जीवन म्हणजे प्रयोगशाळा होती. नवनवीन प्रयोग ते करीत असत आणि जीवनात अर्थ ओतीत असत. निसर्गोपचाराचे महत्त्व त्यांना पटले आणि त्याचे ते भक्त बनले. औषधोपचारावरचा त्यांचा विश्वास उडाला. हवा, पाणी, माती, ऊन अशा निसर्गनिर्मित तत्त्वांनीच हे शरीर-देखील आरोग्यदायी झाले पाहिजे अशी त्यांची श्रद्धा होती आणि ' रामनाम ' हा त्यांच्या दृष्टीने एकमेव उपाय होता.

गांधीजी नुसतेच विचारवंत नव्हते. ते आचारशीलही होते. स्वतःला पटलेल्या सत्यासाठी ते वाटेल तो त्याग करण्यास सिद्ध असत. स्वतःची मुले आजारी पडली तरी त्यांनी निसर्गोपचाराचेच प्रयोग केले.

कस्तुरबांनी गांधीजींच्या या असल्या अभिनव प्रयोगात सतत निष्ठेने साथ दिली हे त्यांचे थोरपण होय !

# पहिला सत्याग्रह

ट्रॉन्सवॉल प्रदेश सरकारने हिंदी लोकांसाठी एक अन्यायी वटहुकूम काढला. आठ वर्षांवरील प्रत्येक स्त्री-पुरुष हिंदी व्यक्तीने तेथे राहण्यासाठी नाव, पत्ता, वय, धंदा, एवढेच नव्हे तर अंगावरच्या खुणा नोंदवून पास काढला पाहिजे व कुठेही जाताना तो बरोबर बाळगला पाहिजे अशी सक्ती या नव्या कायद्याने केली होती. तसेच मजुरी करणाऱ्या प्रत्येक हिंदी व्यक्तीमागे वर्षाला तीन पौंड करदेखील लादला होता आणि याचे पालन न करणाऱ्यास तुरुंगवास, दंड वा हद्दपारीची शिक्षा ठोठावण्यात येईल असे जाहीर केले होते.

हा काळा कायदा म्हणजे हिंदी लोकांचा अमानुष अपमान व छळ करण्याचीच योजना होती. त्यापुढे मान तुकविणे स्वाभिमानी माणसाला शक्य नव्हते.

गांधीजींनी आपल्या ‘ इंडियन ओपिनियन ’ साप्ताहिकात या काळ्या कायद्याविरुद्ध जोरदार टीका केली. सभाही आयोजित केल्या. ११ सप्टेंबर १९०६ च्या जाहीर सभेत महत्त्वाचा ठराव पास झाला. त्यात म्हटले होते, “ आम्ही सर्व तऱ्हेच्या हालअपेष्टा सोसू, परंतु हा हुकूम मानणार नाही.”

हिंदुस्तानातील नेत्यांनींही या कायद्याविरुद्ध आक्रोश उठविला. चळवळीला प्रारंभ झाला. परवाना-पास-काढण्या-विरुद्ध निरोधन सुरू झाले. सरकारनेही दडपशाहीचे धोरण पत्करले. २८ डिसेंबर रोजी, कोर्टात हजर राहा, अशा नोटिसा सरकारने गांधीजी व त्यांचे प्रमुख सहकारी यांचेवर बजावल्या. कोर्टात त्यांना समज देण्यात आली की, १० जानेवारी १९०८ च्या आत परवाने काढा, नाहीतर त्यानंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आत ट्रान्सवॉल सोडून जा.

१० जानेवारी हा दिवस आला नि गेला. कोणीही पास काढला नाही की ट्रान्सवॉलही सोडले नाही. सर्वांना कोर्टात खेचण्यात आले. गांधीजींनी न्यायाधिशांना सांगितले, "जास्तीत जास्त शिक्षा मला द्या."

गांधीजींना दोन महिन्यांची सजा फर्माविण्यात आली. गांधीजींच्या पावलावर पाऊल ठेवून अनेक सत्याग्रही कारागृहात आले. बाहेरही चळवळीत चैतन्य फुलले होते.

पंधराएक दिवसांनंतर बातमी कळली की, सरकार तडजोडीस तयार आहे. जनरल स्मट्स् ह्यांनी सरकारच्या वतीने गांधीजींशी बोलणी सुरू केली, ते म्हणाले, "आज जर तुम्ही स्वेच्छेने परवाने काढाल, तर पुढे हा कायदा रद्द करू."

गांधीजींनी तडजोड मान्य केली. काही जणांना हे पटले नाही. गांधीजी पास काढायला चालले असताना त्यांच्यावर हल्ला झाला. गांधीजी बेशुद्ध झाले. वर मार सुरूच होता. लोक

धावले. त्यांनी गांधीजींना घेरले. डीक नावाच्या धर्मगुरुने संरक्षण दिले. शुद्धीवर आणले. हल्ला करणाऱ्या मीर आलमला क्षमा करून सोडून द्या अशी विनंती गांधीजींनी सरकारला केली. ते त्याबद्दल म्हणाले,

“ माझ्यावर हल्ला करणाऱ्यांना आपण काय करीत आहोत ह्याचे भान नव्हते. हल्ला करणारे मुसलमान होते म्हणून हिंदूंनी संतापू नये. हिंदु जर मुसलमानांवर रागावतील तर तो प्रभूचा अपराध होईल. आज सांडलेल्या रक्ताने हिंदु-मुसलमान अधिक जवळ येवोत. प्रभूच्या कृपेने त्यांचे दृढ ऐक्य जडो ! ”

गांधीजींच्या सांगण्यानुसार हिंदी लोकांनी परवाने काढले. गांधीजींनी आपला शब्द पाळला होता. ते सत्याला जागले होते.

परंतु इंग्रज सरकारने मात्र दिलेला शब्द पाळला नाही. जनरल स्मट्स् यांचेवर गोऱ्यांनी, काळा कायदा रद्द करू नये म्हणून बरेच दडपण आणले. त्याला अनुसरून स्मट्स्नीं सांगितले, “ कायदा रद्द होणार नाही. ”

गांधीजींना ह्या फसवणुकीचे दुःख झाले. हिंदी लोकांना तर संताप आला. आता सत्यासाठी झगडणे आले. गांधीजींनी सरकारला एक तारीख कळविली आणि म्हटले, “ या तारखेच्या आत कायदा रद्द करावा, नाहीतर सगळ्या परवान्यांची होळी करू. ”

सरकारने याची दखलही घेतली नाही. गांधीजींनी सभा भरविली. त्याच वेळी तार आली. सरकारने नकार कळवला

होता. हिंदी लोकांनी आपल्या परवान्यांची होळी केली. ते जाळून टाकले. हल्ला करणारा मीर आलमही त्यात होता. तो म्हणाला, "गांधीजी, मला क्षमा करा." गांधीजींनी त्याला प्रेमाने आलिंगन दिले.

सत्याग्रहाचे पर्व सुरू झाले. अनेक सत्याग्रही तुरुंगात गेले. तुरुंगात गेलेल्या सत्याग्रहींच्या कुटुंबांसाठी 'टॉल्स्टॉय फॉर्म' सुरू करण्यात आला. सर्व धर्मांचे लोक या वसाहतीत राहू लागले. स्वावलंबन करू लागले. शेती, मजुरी, श्रमाची कामे करू लागले. गांधीजींचे निरनिराळे प्रयोग सुरूच असत. उद्योगधंद्याला प्राधान्य देऊन शिक्षणाची रचना करण्याची कल्पना गांधीजींनी प्रथम येथेच अमलात आणली.

काळ्या–गोऱ्यांच्या झगड्यात मध्यस्थी करण्यासाठी नामदार गोखले १९१२ मध्ये आफ्रिकेत आले. गांधीजींनी त्यांची सर्व तऱ्हेची सेवा केली. गोखल्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांशी बोलणी केली. नंतर ते गांधीजींना म्हणाले, "पुढल्या वर्षी काळा कायदा रद्द होईल. सत्याग्रह थांबवा."

गोखल्यांचा आदेश गांधीजींनी मानला. सत्याग्रह थांबविण्यात आला.

वर्ष उलटले पण काळा कायदा रद्द झाला नाही. पुनश्च सरकारने दिलेला शब्द फिरवला. वरती आणखी एक संतापजनक कायदा लादला. या नव्या कायद्यान्वये 'जे विवाह ख्रिश्चन धर्म विधीप्रमाणे झालेले नसतील ते सर्व बेकायदेशीर ठरविण्यात येतील' असे जाहीर करण्यात आले.

या बंधनामुळे स्त्रिया संतापल्या; कारण त्यांच्या पत्नीत्वाचा, पावित्र्य भावनेचा यात मोठा उपमर्द होता. पातिव्रत्याची क्रूर थट्टाच सरकारने केलेली होती. स्त्रियांनीही सत्याग्रहात भाग घेण्याचे ठरविले. गांधीजींनाही ते उचित वाटले. स्त्रियांमध्ये जागृती आली. त्या न्यायासाठी पुढे सरसावल्या. गांधीजींनी त्यांना तुरुंगवासाची, तेथल्या हालअपेष्टांची अपमानाची कल्पना दिली. त्या वीर भगिनी निश्चयाने म्हणाल्या, " आम्ही सारे काही सहन करू. " कस्तुरबा देखील त्यांच्यांत एक सत्याग्रही म्हणून सामील झाल्या.

दृढ निश्चयाने सारी संकटे झेलीत सत्याग्रही महिलांनी ट्रान्सवालची हद्द ओलांडली. नाताळमध्ये त्यांनी प्रवेश केला न्यू कॅसल येथल्या खाणींजवळ येऊन ठेपल्या. तेथे काम करणाऱ्या मजूरबंधूंना त्या म्हणाल्या, " आमच्यावर अन्याय झाला आहे. आम्ही दुःखी कष्टी आहोत. आम्हांला सहाय्य करा. खाणीत काम करायचे बंद करा. "

भगिनींचे दुःख ऐकून मजुरांची अंतःकरणे द्रवली. त्यांनी आपले काम बंद ठेवले. हळूहळू साऱ्याच ठिकाणच्या मजुरांनी काम करायचे नाकारून सरकारशी असहकार पुकारला. आणखी कित्येक महिला पुढे आल्या. आंदोलनात नवचैतन्य संचारले. अन्यायाची चीड प्रभावीपणाने व्यक्त होऊ लागली. गोऱ्या सरकारचे माथे भडकले. सत्याग्रही महिलांना तुरुंगात डांबण्यात येऊ लागले. तीन-तीन महिन्यांची शिक्षा ठोठावली. तुरुंगातील अव्यवस्थेमुळे व वाणेरड्या अन्नामुळे कित्येक

महिलांची प्रकृती बिघडली, कस्तुरबा तर खूपच अशक्त बनल्या.

वलीअम्मा नावाची सोळा वर्षांची तडफदार तरुणी अंधार-कोठडीत खितपत पडली. मृत्युशय्येवर तळमळू लागली तेव्हा तिला सरकारने मुक्त केले. गांधीजी भेटीस गेले. तिचा कृश हात कुरवाळीत त्यांनी विचारले, " बेटी, तुरुंगात गेल्याबद्दल पश्चाताप होत आहे ना ? "

" नाही बापूजी. बरी झालेच तर माझ्या देशबांधवांच्या-साठी मी पुन्हा तुरुंगात जाईन. " वलीअम्मा म्हणाली. तिला हालअपेष्टांची, संकटांची, मरणाची मुळीच भीती नव्हती. आणि अखेरीस वलीअम्मा देवाघरी गेली. निष्ठेची, शांतीची स्फूर्ती ठेवून गेली.

मजुरांनी खाणीत काम करायचे बंद केल्यावर दडपशाहीला आणखीनच ऊत आला. मालकांनी त्यांना चाळीबाहेर हुसकले. सरकारने खाणीजवळच कुंपण घालून तेथेच कामगारांना अडकवून ठेवले आणि त्यांच्यावर कामाची सक्ती सुरू केली. गोरे घोडेस्वार पोलीस मारहाणही करीत.

गांधीजींनी काहीजणांना टॉल्स्टॉय फार्मवर नेण्याचे ठरवले. नाताळमधून ट्रान्सवॉलमध्ये जायचे म्हणजे कायदेभंग करावा लागणार होता. गांधीजींना सरकारने दोन-तीन वेळा अटक करून नेले. परंतु सत्याग्रहींचा धीर खचला नाही. शेवटी गांधीजींना नऊ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली गेली. दुसऱ्याही एका कोर्टाने तीन महिन्यांची शिक्षा

फर्माविली. पुष्कळशा सत्याग्रहींना अटकेत ठेवले. गांधीजींनीं तुरुंगातही आदर्शवत वर्तन ठेवले. हाताला रक्त येई, तरी ते खडी फोडण्याचे काम करीत असत. भंगीकामही केले. तुरुंगाचे नियम ते काटेकोरपणाने पाळीत असत.

खाणीत मजुरांकडून सक्तीने काम घेण्यात येई. त्यांनी जेव्हा ते नाकारले तेव्हा सरकारने गोळीबार केला. काही मजूर-सत्याग्रही बळी पडले.

आफ्रिकेतल्या दडपशाहीची वार्ता हिंदुस्तानात कळताच संतापाची लाट उसळली. नामदार गोखलेही अस्वस्थ झाले. आपल्याला आश्वासन देऊन सरकारने ते पाळले नाही याची त्यांना चीड आली. त्यांनी सरकारची कडक शब्दांत कान-उघडणी केली. आफ्रिकेतल्या सत्याग्रहींसाठी हिंदुस्तानात दौरे काढून फंड जमविला. सरकारची सर्वत्र नाचक्की झाली. एवढी दडपशाही करूनही सत्याग्रहींची शक्ती वाढतच राहिली.

अखेरीस सरकारला शहाणपण सुचले. त्यांनी गांधीजींशी वाटाघाटी केल्या. सगळी लग्ने कायदेशीर ठरली. तीन पौंडांचा कर माफ झाला. एका बलाढ्य शक्तीशी निःसंशय लोकांनी, शांततेने व निष्ठेने दिलेला हा लढा जगाच्या इतिहासात अपूर्व होता. सत्याग्रहाचे अमोल साधन येथेच गवसले. पुढे याच सत्याग्रह शस्त्राचा त्यांनी पुष्कळच विकास केला. तथापि आफ्रिकेच्या भूमीवरच गांधीजींनी सत्य व अहिंसेच्या साधनांनी आपली पहिली लढाई जिंकली. या विजयाने जग स्तिमित झाले !

# भारताच्या सेवेत

वीस वर्षांनी १९१४ साली, गांधीजींनी आफ्रिकेचा मोठ्या प्रेमाने निरोप घेतला. या वीस वर्षांत बराच मोठा अनुभव गांधीजींनी गाठी बांधला होता. सत्याग्रहाचे नवीन तंत्र विकसित केले होते. आफ्रिकेतील हिंदी बांधवांना न्याय मिळवून दिला होता. हिंदुस्तानात याचे कौतुक चालले होते. आदराने धन्योद्‌गार निघत होते आणि त्याच सुमारास गांधीजी मायदेशी परतले होते.

हिंदुस्तानात आल्यावर गांधीजींनी पुण्यास जाऊन गोखल्यांची आधी भेट घेतली. गांधीजींच्या कर्तृत्वावर गोखले खूष होते. गांधीजींच्या विषयी गोखले एकदा म्हणाले होते, " भारतीय संस्कृतीमधील सर्व शुचिता व दिव्यता गांधीजींच्या द्वारा प्रकट झाली आहे. हिंदी संस्कृतीचा परमोच्च विकास म्हणजे गांधीजींची मूर्ती. "

आपल्या भेटीत गोखल्यांनी गांधीजींना प्रथम सर्व भारत हिंडून-फिरून बघा आणि मग विचारपूर्वक काय करायचे ते ठरवा असा सल्ला दिला. आपल्या भारत सेवक समाजाचे कार्य करण्यास यावे अशी इच्छाही व्यक्त केली.

गांधीजींनी भारतयात्रा सुरू केली. कलकत्त्यानजीक कवि-श्रेष्ठ गुरुदेव रवींद्रनाथांचे ' शांति निकेतन ' आहे. तेथे ते गेले.

तेथील विद्यार्थ्यांनी आफ्रिकेतील सत्याग्रहाला मदत धाडली होती. शांतिनिकेतनातील प्रसन्न वातावरण व गुरुदेवांचा सहवास गांधीजींना फारच आवडला. तेथे असतानाच गोखल्यांच्या निधनाची दुःखद वार्ता कळली. गांधीजी हळहळले. गोखल्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढची वाटचाल करण्याची त्यांची मनीषा मावळली.

ठिकठिकाणी हिंडून गांधीजींनी भारतीय समाजपुरुषांचे दर्शन घेतले. केवढा मोठा प्राचीन, विस्तृत नि संस्कृतीसंपन्न देश ! पण आता दारिद्र्य, रोगराई, अज्ञान आणि पारतंत्र्य या काळोखात पिचत होता. गांधीजींना मनस्वी दुःख झाले.

१९१६ साल. बनारस विद्यापीठाचा पदवीदान समारंभ होता. गांधीजींना मदनमोहन मालवीयांनी निमंत्रण दिले होते. बेझंटबाई अध्यक्ष होत्या. श्रोत्यांमध्ये मोठमोठे संस्थानिक, राजेमहाराजे बसलेले होते. त्यांची उंची वस्त्रे व मौल्यवान अलंकार बघून गांधीजी बोलताना म्हणाले, “ मला हे दृश्य बघवत नाही. संस्थानातील प्रजा दुःखीकष्टी असताना यांना असे विलासी जीवन उपभोगण्याचा काय अधिकार ? ही संपत्ती म्हणजे प्रजेची ठेव. ती प्रजेच्या कल्याणासाठीच वापरली पाहिजे.”

गांधीजींचे हे स्पष्ट, रोखठोक व कळकळीचे भाषण ऐकून सारेच स्तिमित झाले. शिवाय गांधीजी बोलले हिंदीमधून !

गांधीजी परतले; त्याच सुमारास युरोपात महायुद्ध सुरू झाले होते. राज्यकर्त्यांना साहाय्य करण्याच्या उदात्त हेतूने

त्यांनी सैन्यभरतीचा प्रचार केला. पण लोकांत मुळीच उत्साह नव्हता.

त्या सुमारास लखनौला काँग्रेसचे अधिवेशन झाले. गांधीजी उपस्थित राहिले. तेथेच बिहारमधील राजेंद्रप्रसाद आदी कार्यकर्ते त्यांना भेटले व म्हणाले, " चंपारण्यात निळीचे मळे आहेत. तेथे काम करणाऱ्या मजुरांवर अनन्वित अत्याचार होत आहेत. त्यांना या छळातून मुक्त करण्यासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गांधीजी तुम्ही चला."

गांधीजींनी सगळी परिस्थिती समजावून घेतली. कार्यकर्त्यांची तयारी अजमावली आणि चंपारण्याकडे पावले वळविली. गांधीजींनी शेतकऱ्यांत हिंडून त्यांना दिलासा दिला.

गोरे मळेवाले अमानुष रीतीने मजुरांना छळीत होते. त्या छळाच्या कहाण्या ऐकूण गांधीजींचे अंतःकरण व्यथित झाले. त्यांनी या लढ्याला साहाय्य करण्यासाठी देशाला आवाहन केले आणि सगळीकडून स्वयंसेवक आले.

बिहारमधल्या इंग्रज सरकारचे पित्त खवळले. त्याने गांधीजींना फर्माविले, " बिहार सोडून जा." गांधीजींनी कळविले, " मी सेवा करण्यासाठी आलो आहे. अन्याय असेल तोच दाखवीन. उगाच अतिशयोक्ती करणार नाही. तेव्हा माझ्याविषयी निःशंक असावे. मी बिहार सोडून जाणार नाही."

सरकारने गांधीजींवर खटला भरला. सत्याग्रहाची मोहीम सुरू झाली. अनेक कार्यकर्त्यांनाही तुरुंगाची हवा चाखावयाला मिळाली. शेवटी सत्याचा विजय झाला. मजुरांच्या मागण्या

मान्य झाल्या. गांधीजींना राजेंद्रप्रसादांच्या सारखा सत्त्वशील नम्र, बुद्धिवान व धडाडीचा सहकारी लाभला.

हिंदुस्तानात परतल्यावर कुठे तरी स्थिर व्हावे; असे गांधीजींना वाटत होते. गुजरातच्या भूमीवरील साबरमती नदीच्या तीरावरील जागा त्यांनी निवडली. येथून अहमदाबाद शहर जवळ होते. जागा प्रसन्न, रम्य व शांत होती. मित्रांनी मदत केली. गांधीजींचा 'साबरमती आश्रम' सुरू झाला. मगनलाल गांधी, काकासाहेब कालेलकर, विनोबाजी यांच्या-सारखे सहकारी तेथे आले. श्रीमंत-गरीब, शिक्षित-अशिक्षित, स्त्री-पुरुष सगळ्या वर्गांचे, सगळ्या जातींचे, सगळ्या धर्मांचे लोक एका परिवारातील बनून राहू लागले. स्वावलंबी, सेवामय व पवित्र, त्यागी जीवन जगू लागले. आश्रम-शाळेत गणित, भूगोल, इतिहास, संस्कृत, इंग्रजी, हिंदी इत्यादी विषयांबरोबरच शेती, सूतकताई, विणाई हे शरीरश्रमाचे शिक्षणही दिले जाऊ लागले. स्वच्छतेचे धडे गांधीजींनी स्वतः हातात झाडू घेऊन दिले.

खेड्यापाड्यांतील उपाशी, बेकार जनता पाहून गांधीजींनी ठरवले; यांना मजुरी देणाऱ्या चरख्याचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. गांधीजींनी चरख्याचा व खादीचा कार्यक्रम हाती घेतला. खेड्याखेड्यांतून चरखे फिरू लागले. खादी विणली जाऊ लागली. गोरगरिबांना मजुरी मिळू लागली. चरखा हे गांधीजींचे दैवतच बनले.

सामुदायिक प्रार्थनेचाही प्रयोग त्यांनी आरंभिला. शरीर-शुद्धीप्रमाणेच चित्तशुद्धीवर त्यांनी भर दिला. प्रार्थनेने हृदयातील सद्भावनेचा विकास होतो. परिपोष होतो. दृष्टी व्यापक बनते. नम्रता अंगी येते. प्रेमभावना वाढीस लागते आणि सर्वांभूती समता जागृत होते. गांधीजींनी आपल्या प्रार्थनेत सर्व धर्मांतील उच्च विचारांचा; भजनांचा व गीतांचा समावेश केला. सहिष्णुतेची व सर्वधर्मसमभावाची वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

आश्रमाव्यतिरिक्त गांधीजींचे कार्य आजुबाजूच्या भागात सुरूच होते. अहमदाबादच्या म्युनिसीपालटीतील लोकप्रतिनिधींना त्यांनी आवाहन केले आणि स्वच्छ अहमदाबादची मोहीम सुरू केली. शहरातील गलिच्छ गल्ली-बोळ स्वच्छ होऊ लागले. जनसेवेची शिकवण मिळाली.

अहमदाबादच्या कोर्टात गांधीजी जात आणि तेथील वकील लोकांना मदतीसाठी बोलावीत. त्यांच्याशी चर्चा करीत. वल्लभभाई पटेल येथेच भेटले. प्रथम त्यांना गांधीजींचे म्हणणे पटले नाही, परंतु चिकाटी, सद्भावना व निःस्वार्थी क्रियाशीलता पाहून तेही अखेरीस गांधीजींचे सहकारी बनले.

गुजरात प्रदेशात खेडा नामक जिल्हा आहे. खेडा जिल्ह्यात दुष्काळामुळे पिके बुडाली. शेतकऱ्यांची दैना उडाली. परंतु सरकारने काहीही मदत न करता संपूर्ण शेतसारा वसूल करायचे ठरवले. शेतकरी हवालदिल बनले. कसा भरणार सारा ?

गांधीजी त्यांची कड घेऊन उभे राहिले. शेतकऱ्यांत फिरले. त्यांची संघटना बनली. त्यांच्यांत आत्मसामर्थ्याची जाणीव उत्पन्न केली. आणि त्यांच्याच मुखाने सरकारला सांगितले, “ आम्ही सारा देणार नाही. ”

साराबंदीची चळवळ यशस्वी करण्यासाठी गांधीजी अहोरात्र श्रमले. गावोगावी पायी हिंडले. अनेक सभांतून बोलले. अतिश्रमाने आजारी पडले. अतिसाराचे दुखणे झाले. परंतु थोडे बरे वाटताच परत पायाची चक्रे फिरू लागली. सारा खेडा जिल्हा गांधीजींच्या पाठीशी उभा राहिला. हे सामर्थ्य पाहून सरकारही हादरले. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या. गांधीजींचा लढा यशस्वी झाला. ही सारी किमया वल्लभभाईंनी पाहिली. ते गांधीजींच्या बरोबर सर्वत्र होते. त्यांना गांधीजींच्या विषयी आदर वाटू लागला.

शेतकरी जागा होत होता, मजुरांतही चैतन्य आणण्यासाठी गांधीजी झटू लागले. अहमदाबादला कापडाच्या गिरण्यांतून शेकडो मजूर राबत होते; परंतु त्यांचे जीवन पालापाचोळ्यागत तुच्छ व निःसत्त्व बनले होते. त्यांच्या श्रमावर ऐतखाऊ गबर बनत होते. गांधीजींनी मजुरांची संघटना बांधण्यास सुरुवात केली. कामगारांतही चैतन्य संचारले. ते गांधीजींच्या भोवती जमा झाले. आपल्या मागण्यांसाठी झगडू लागले. ते संपावर गेले. पण गिरणी मालकांनीही ताठर धोरण स्वीकारले. संप बरेच दिवस चालला. कामगारांना तग धरणे अवघड जाऊ लागले. त्यांच्यांत विफलतेची भावना

येऊ लागली. गांधीजींना दुःख झाले. ते पुढे सरसावून म्हणाले, "कामगारांची हिंमत खचत असेल तर मी उपवास करतो."

आणि गांधीजींनी कामगारांसाठी उपवास आरंभिला. हाच त्यांचा भारतामधील पहिला उपवास. सत्याग्रहाचा नवा पैलू. आत्मक्लेशाने विरोधकांचे हृदयपरिवर्तन करण्याचा हा दिव्य प्रयत्न !

गांधीजींच्या उपवासाच्या वार्तेने सर्वत्र खळबळ माजली. गिरणी मालकही नमते घेण्यास तयार झाले. मजूर–मालकांत तडजोड झाली. गांधीजींचे उपोषण यशस्वी झाले. त्यातून त्यांना नवे बळ लाभले. कामगारांची 'मजूर–महाजन' नामक आदर्श संघटना मजबूत झाली. पुढे गांधीजींच्या प्रत्येक लढ्यात या संघटनेने भाग घेऊन देशाची सेवा बजावली.

किसान–कामगार उठले पण अद्याप अस्पृश्य अंधारातच होते. पशुतुल्य जीवन जगत होते. एकदा खेडा जिल्ह्यात हिंडत असताना गांधीजींना आढळले की, सभेच्या कडेला दूर काही लोक बसले आहेत. चौकशी केल्यावर त्यांना कळले की ते अस्पृश्य आहेत. गांधीजींना ते असह्य झाले. ते म्हणाले, त्यांना इकडे येता येत नसेल तर मी त्यांच्याकडे जातो." आणि गांधीजी त्यांच्यात जाऊन बसले.

साबरमतीच्या आश्रमातही त्यांनी एक अस्पृश्य कुटुंब आणून ठेवले. पूर्व संस्कारामुळे कस्तुरबांना व काही कार्यकर्त्यांना हे पसंत पडले नाही. गांधीजी त्यांना म्हणाले,

"आपला धर्म, प्रत्येक प्राणीमात्रावर प्रेम करा, असे सांगतो. शिवाशिव पाळणे हा मानवतेवरचा कलंक आहे. तो आपण धुऊन काढला पाहिजे. आपल्याच बांधवांवरती असा अन्याय करत राहू तर आपण कसले सत्याग्रही? ही देखील माणसेच आहेत. मग त्यांच्यावर नको का प्रेम करायला! आफ्रिकेत गोऱ्यांनी आमच्याशी असे वर्तन केले की आम्हांला राग येतो, पण आपण येथे भारतात या बंधूंशी कसे वागतो? हे आपल्याला शोभत नाही. आजवर या बांधवांना माणुसकीस पारखे केले. हे महान पाप आपल्या हातून घडले आहे, आता ते धुऊन काढू या. यांना जवळ घेऊ या, समान लेखू या, माणसांत आणू या."

गांधीजींचे मत सर्वांनाच पटले. आयुष्यभर गांधीजी दलितांच्या उद्धारासाठी झटत राहिले. त्यांनी अस्पृश्यांना 'हरिजन' नावाने संबोधिले. 'हरिजन सेवा-संघा'ची स्थापना पुढे केली. दररोज प्रार्थनेच्या वेळी हरिजन उद्धाराच्या पवित्र कार्यासाठी ते निधी जमवीत, निधी घेऊनच स्वाक्षरी देत असत. आपल्या साप्ताहिकाचे नाव देखील त्यांनी 'हरिजन' असे ठेविले होते. दलितांविषयी गांधीजींना तळमळ व सहानुभूती वाटे.

★

# गांधीयुगाचा उदय

१९१८ साली युरोपातले महायुद्ध थांबले. युद्धासाठी इंग्रजांना हिंदी लोकांनी पुष्कळच मदत केली होती. कोट्यवधी रुपये दिले होते. लाखो सैनिक धारातीर्थी पडले होते. खुद्द गांधीजींनीही युद्धप्रचार करून सहाय्य दिले होते. तेव्हा आता हिंदुस्तानचे हे सहकार्य लक्षात घेऊन ब्रिटिश सरकार काही सवलती देईल अशी सर्वांचीच अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात घडले उलटेच. सरकारने रौलेट कमेटी नेमून बंगालमधील क्रांतिकारकांची चौकशी आरंभिली. या चौकशीनंतर सरकारने ठरविले की, भारतात आपल्याविरुद्ध गुप्त कट होत आहेत, क्रांतिकारी पक्ष गुप्तपणे काम करीत आहेत; तेव्हा त्यांना चिरडून टाकण्यासाठी कडक कायद्यांची आवश्यकता आहे. त्यानुसार रौलेट बिल पास केले. या नवीन कायद्याने होते नव्हते तेवढे स्वातंत्र्यही हिरावून घेतले गेले. पोलिसांना अमर्यादित अधिकार देण्यात आले.

रौलेट बील पास झाले आणि उभ्या भारतात संतापाची लाट उसळली. गांधीजींचाही घोर अपेक्षाभंग झाला होता. त्यांनी सरकारला बजावले, "या कायद्याविरुद्ध हिंदी लोकांना सत्याग्रह करावा लागेल." आणि गांधीजींनी देशव्यापी दौरा केला. जनमत सत्याग्रहाला अनुकूल बनविले.

६ एप्रिल १९१९ ही तारीख निश्चित करण्यात आली. या दिवशी देशभर सरकारविरोधी निदर्शने, हरताळ व उपवास करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला. गांधीजींनी मुंबईत प्रचंड सभा घेतली. लोकमत जागृत बनवले.

तिकडे पंजाबमध्ये भीषण घटना घडली. अमृतसरमधील जालियनवाला बागेत लोकांच्या जमावावर क्रूरपणाने गोळीबार करण्यात आला. शेकडो लोक किडा-मुंगीप्रमाणे मारले. निःशस्त्र व निरपराध स्त्री-पुरुषांची हत्या करून ब्रिटिशांनी आपली राक्षसीवृत्ती प्रकट केली होती, देशभर क्रोधाची ठिणगी धुमसू लागली. ठिकठिकाणी सरकारी कृत्याचा कडक निषेध करण्यात आला. गांधीजींना पंजाबात पाऊल ठेवण्यास बंदी करण्यात आली.

देशातील सर्वच नेत्यांनी या दुष्ट हत्याकांडाची चौकशी व्हावी अशी सरकारकडे मागणी केली. सरकारने लोकांतील असंतोष लक्षात घेऊन हंटर कमिशन नेमले आणि काही तरी थातूर-मातूर करून चौकशीचे नाटक पार पाडले. त्याच सुमारास कॉंग्रेसनेही आपली चौकची कमिटी नेमली होती. या कमिटीने संपूर्ण चौकशी करून सरकारच्या पदरी पुराव्यासह दोषाचे माप घातले होते.

गांधीजींनी अशा सरकारशी असहकार पुकारावा असा विचार मांडला. १९२० सालची कॉंग्रेस नागपूर येथे भरली. गांधीजींच्या असहकाराच्या ठरावाला सर्वांनी पाठिंबा दिला. नेहरू पितापुत्र, देशबंधु, वल्लभभाई इत्यादी नेते हिरीरीने पुढे

आले. गांधीजींनी आपल्या ' नवजीवन ' या गुजराती व 'यंग इंडिया' या इंग्रजी साप्ताहिकांतून विद्यार्थी, शिक्षक, वकील, आदी सर्वांना असहकारितेच्या आंदोलनात भाग घेण्यासाठी कळकळीचे आवाहन केले. देशभर दौरा करून जनमानसाला हाक दिली. १ ऑगस्ट १९२० हा दिवस देशभर संप, हरताळ, सभा यांसाठी मुक्रर करण्यात आला आणि त्याच दिवशी मुंबईत लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले. गांधीजींनी या श्रेष्ठ व ज्येष्ठ पुढाऱ्याला श्रद्धांजली वाहिली. टिळकांच्या अंत्ययात्रेत ते सामील झाले. त्यांनी खांदाही दिला.

भारतीय राजकारणात क्रांतिकारक बदल होत होता. टिळकपर्व संपून गांधीयुगाचा उदय होत होता. स्वातंत्र्याची लढाई गांधीजींनी खेड्यापाड्यात, घरोघरी नेली. सामान्य माणूसही निर्भयपणाने स्वराज्याची भाषा बोलू लागला. सबल, दुर्बल, गरीब, श्रीमंत, व्यापारी, नोकर, वकील, अध्यापक, विद्यार्थी, तरुण, स्त्री-पुरुष सारे नवचैतन्याने उठले; देशप्रीतीने भारून निघाले. आपापली कामे, व्यवसाय सोडून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात उतरले. एक अपूर्व उत्साहाचे वारे देशात वाहू लागले.

गांधीजी हे एक उत्कृष्ट संघटक होते. तसेच माणसाची पारखही त्यांना चांगली होती. या नव उत्साहाने आलेल्या लोकांना त्यांनी अनेकविध कामे सुरू करून गुंतवून टाकले. स्वातंत्र्याचा लढा लढत असतानाच देशामध्ये नवरचनेची

विधायक कामेही त्यांनी शोधून ती तेवढ्याच आग्रहाने चालू ठेवली. हे गांधीजींचे वैशिष्ट्य होय. खादीप्रचार, राष्ट्रीय शिक्षण, शेती, हरिजनोद्धार, निसर्गोपचार, प्रार्थना, ग्रामोद्योग, गोपालन, कुष्ठसेवा अशा अनेकविध आघाड्यांवरून स्वातंत्र्याची लढाई त्यांनी सुरू ठेवली. त्यामुळे गुणवान माणसे कार्यरत राहिली, चळवळ स्वावलंबी होण्यास मदत झाली आणि स्वातंत्र्याबरोबरच समाजरचनेचे महत्त्वही कळले; कारण स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर जादूच्या कांडीने काही सुखसमृद्धी निर्मिता येणार नव्हती किंवा स्वातंत्र्यात तशीच विषमता, अस्पृश्यता, अज्ञान, रूढिप्रियता व आळस ठेवायचा नव्हता. स्वातंत्र्याला साजेशी परिस्थिती आणायची तर त्याची तयारी आतापासूनच केली पाहिजे एवढी दूरदृष्टी गांधीजींच्या जवळ होती.

१९२१ सालच्या अखेरीस 'प्रिन्स ऑफ वेल्स' हिंदुस्तानला भेट देण्यासाठी इंग्लंडहून येणार होते. सरकारने त्यांच्या स्वागताचे व सत्काराचे टोलेजंग कार्यक्रम आखले. परंतु या सर्व समारंभांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय काँग्रेसने केला. तथापि मुंबईमध्ये काही सरकारधार्जिण्या मंडळींनी स्वागतामध्ये भाग घेतलाच; आणि त्यावरून शहरामध्ये अशांतता माजली. दंगा झाला. गांधीजी शांतता प्रस्थापित करण्यासाठी धावले. त्यांनी पाच दिवसांचा उपवासही केला. उपवासाच्या काळातही ते अशांत भागात हिंडून दंगा शमवीत होते.

१९२२ साल उजाडले आणि गुजरातमधील बार्डोलीचा प्रश्न उग्र बनला. गांधीजींनी बार्डोली तालुक्यात करबंदीची चळवळ हाती घेण्याचा निर्णय केला. वल्लभभाई पटेलांच्या पाठीशी सारा तालुका उभा राहिला. तेव्हापासूनच त्यांना 'सरदार' म्हणू लागले. वातावरण तापले होते. परंतु उत्तर हिंदुस्तानात अत्याचार घडले. चौरीचुरा येथे क्रांतिकारकांनी हिंसक कृत्ये केली म्हणून गांधीजींनी बार्डोलीची चळवळ रद्द केली. राष्ट्रात सर्वत्र निराशा पसरली. गांधीजींच्या धोरणावर खरमरीत टीकाही झाली. परंतु गांधीजी म्हणाले, "मी सत्याला धरून राहिलो. स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून वागलो."

तथापि, ब्रिटिश सरकारने गांधीजींवर खटला भरलाच. इंग्रज न्यायाधीश होते. ते म्हणाले, "गांधीजी, इंग्रज राज-वटीच्या दृष्टीने आपण धोकेबाज आहात, सरकारविरुद्ध आपण लोकांना भडकावीत आहात, त्यापासून आपणांस आम्ही कसे रोखावे ?"

"मला आपण शिक्षा द्या" गांधीजींनी सांगितले, आपण जर मला मुक्त ठेवले तर मी माझ्या देशाला अधिक संघटित करण्याचा प्रयत्न करीन. माझे सत्याग्रहाचे शस्त्र हे आपल्या बंदुकीपेक्षा शंभरपटीनी शक्तिशाली आहे."

"पण आपण स्वस्थ का नाही बसत ? आपणांसारख्याला तुरुंगात धाडताना आम्हांला दुःख होते" न्यायमूर्ती म्हणाले, "महाराज, कसं सांगू आपणाला" गांधीजी म्हणाले, "मी माझे कर्तव्य करीत आहे. आमची जनता दुःखी, कष्टी

आहे तिला मदत करणे हे माझे प्रथम कर्तव्य नाही का ? सत्याग्रहाशिवाय दुसरा इलाज मला तरी दिसत नाही. मी माझे कर्तव्य करतो, आपण आपले करा. जास्तीत जास्त शिक्षा मला द्या."

गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. गांधीजी सामान्यांच्या अंतःकरणांत कसे स्थिरावले होते याची ही घटना निदर्शक आहे. खटला चालवताना कोर्टात जेव्हा गांधीजींना 'आपला' धंदा काय ? असे विचारण्यात आले. तेव्हा गांधीजींनी उत्तर दिले होते, "विणकर व शेतकरी." पुढे गांधीजींना वरीलप्रमाणे शिक्षा झाल्याचे ऐकून बंगालमधील एक गरीब दुःखाने रडू लागला. त्याच्या मालकाने विचारले,

"अरे, काय झाले रडायला ?"

"गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा झाली."

"मग त्यासाठी तू का रडतोस ?"

"मालक, गांधीजी आमच्या गोरगरिबांचे आहेत. ते आमच्याप्रमाणेच शेतकरी आहेत, विणकर आहेत. आमच्या-साठी गांधीजी जीव पाखडीत आहेत."

पुण्याजवळ येरवड्याच्या तुरुंगात गांधीजींनी दोन वर्षे काढली. तेवढ्या अवधीत त्यांना ॲपेंडिसाइटिसचा त्रास होऊ लागला. पोट दुखू लागले. आजार वाढला. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्यास सांगितले. सरकारने आजाराच्या निमित्ताने गांधीजींना मुक्त केले. पुण्याच्या ससून इस्पितळात शस्त्रक्रिया झाली आणि नंतर गांधीजी विश्रांतीसाठी जुहूला गेले.

१९७४ साली देशात सर्वत्र हिंदु-मुसलमानांचे दंगे उद्भवले. गांधीजी दोन्ही जमातींमध्ये ऐक्य नांदावे म्हणून सदैव झटत असत. परंतु आपल्या सत्तेच्या स्थिरतेसाठी ब्रिटिश सरकारच मुसलमानांना चिथावणी देत असे. अल्प-संख्यांक म्हणून त्यांना जादा सवलती देत असे. दोन्ही जमातींत भांडणे लावून द्यायचे कृष्णकृत्य करीत असे. 'फोडा आणि झोडा' ही त्यांची रीत. यामुळे दोन्हीही जमातींची अंतिम हानी होते आहे हे सत्य गांधीजी जाणून होते. दंग्यांनी पेट घेतला, त्यावेळी ते दिल्लीत होते. तेथूनच त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी एकवीस दिवसांचे उपोषण जाहीर केले. स्व-शुद्धीने लोकशुद्धी साधण्याचा हा त्यांचा आध्यात्मिक मार्ग होता. उपोषणाच्या अग्निदिव्यातून गांधीजी पार पडले. अखेरीस दिल्लीतच सर्व धर्मीयांची एक ऐक्य परिषद झाली. ऐक्याच्या दिशेने एक पाऊल तरी पुढे पडले.

त्या सालची, म्हणजे १९२४ ची, काँग्रेस बेळगाव येथे भरली होती आणि गांधीजीच अध्यक्ष होते. गांधीजींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात निरनिराळ्या विधायक कार्यांची महती सांगून त्यावर भर देण्याचा आदेश दिला. जमनालालजी बजाज नावाचे धनिक गृहस्थ गांधीजींना येऊन मिळाले. त्यांना गांधीजींनी पुत्र मानले आणि खादीचा कारभार त्यांच्यावरच सोपविला. चरख्याचा प्रसार सर्वत्र होत होता. "माझा देव चरखा" असे गांधीजी म्हणत. स्वतःच्या वाढदिवसाला त्यांनी 'चरखा जयंती' असेच नाव ठेवले.

# अपूर्व दांडी यात्रा

१९२९ सालची काँग्रेस लाहोरला भरणार होती. गांधीजींनी सुचविले, "तरुण जवाहरलालला. अध्यक्ष करा." पंडितजी म्हणजे अपार उत्साह! उसळते चैतन्य! त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव पास करून घेतला. भारताचा स्वातंत्र्यलढा आणखी चार पावले पुढे सरकला. हा महत्त्वाचा टप्पा होता. २६ जानेवारी १९३० रोजी, देशभर सर्वत्र पहिला स्वातंत्र्य-दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून १५ ऑगस्ट १९४७ रोजी, सत्तांतर होईपर्यंत दरवर्षी २६ जानेवारी हाच दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्यात येई.

संपूर्ण स्वातंत्र्याच्या अनुरोधाने गांधीजींनी व्हाइसरॉयला एक पत्र लिहून अकरा मागण्या कळविल्या. त्यामध्ये लष्करावरचा खर्च निम्म्याने कमी करावा, सरकारी बड्या अधिकाऱ्यांच्या वेतनात कपात करावी, शेतसारा कमी व्हावा मिठावरचा कर उठवावा, दारुबंदी करावी अशा प्रमुख मागण्या होत्या. परंतु व्हाईसरॉयने त्या मान्य करण्यास नकार दिला. गांधीजी म्हणाले, "मी भाकरी मागितली, परंतु दगड मिळाले."

गांधीजी अंतर्मुख बनले. विचार करू लागले, 'पुढे काय

करायचे ?' लढा तर अटळ दिसू लागला. मागण्या फेटाळल्यावर गांधीजी आता पुढे काय करणार, कोणता आदेश राष्ट्राला देणार, म्हणून सारा देश उत्सुक बनला.

आणि गांधीजींना विचार करता करता मार्ग दिसला. त्यांच्या मागणीतली एक मागणी 'मिठाचा कर रद्द करावा' अशी होतीच. गांधीजींनी ह्याच मागणीवर अभिनव रीतीने सत्याग्रह करायचा असा निर्णय केला. पुनश्च देशात उत्साह संचारला. मिठाचा कायदा मोडून मीठ बनवायचे ! केवढी लहानशी वस्तू, मीठ ! पण त्याला स्वातंत्र्याच्या प्रतिकाचा महान आशय लाभला. ठिकठिकाणी, सागरकिनारी मिठाचा कायदेभंग होणार असे सरकारला कळविण्यात आले. स्वतः गांधीजी गुजरातमधील 'दांडी' या गावी जाऊन कायदेभंग करणार होते. १२ मार्च १९३० च्या सकाळी साबरमती आश्रमातून गांधीजींची पदयात्रा दांडीकडे निघाली. बरोबर भारतातील निवडक ऐशी सत्याग्रही होते. चोवीस दिवस ही पदयात्रा गावागावातून स्वातंत्र्याचा संदेश देत दांडीकडे गेली. वाटेत अनेक हृदयंगम प्रसंग घडले. शेवटी दांडीच्या समुद्रतीरावर उभे राहून "ही पहा मी साम्राज्यशाही नष्ट करतो" असे म्हणून गांधीजींनी मिठाचा खडा हातात घेतला.

सत्याग्रह–संग्रामाची तुतारी निनादली. देशभर कायदेभंग करण्यात आला. सत्याग्रहींनी मूठ मूठ मीठ उचलले. गांधीजींनी सांगितले, " मुठीतले मीठ पोलिसांच्या दरडावण्याने

टाकू नका. त्यांना ते मूठ उघडून घेऊ दे." मुठी रक्तबंबाळ झाल्या. लाठीमार झाला. अनेकांना अटक झाली.

गांधीजींना, आपल्यालाही अटक होणार याची कल्पना होतीच. आणि एका मध्यरात्री पोलीस अधिकाऱ्यांनी येऊन त्यांना अटक करून नेले.

आपल्या आदरणीय नेत्याला अटक केल्याचे कळताच देशभर प्रक्षोभाची लाट उसळली. ठिकठिकाणी मिठागरे लुटण्याचा कार्यक्रम झाला. जनता भडकली, सरकारही भडकले! गोऱ्या सोजीरांनी, घोडेस्वारांनी निरपराध, निःशस्त्र जनतेवर हल्ले चढविले. लाठीमार झाला, गोळीबार झाला. सोलापूरला लष्करी कायदा जारी करण्यात आला. चार हुतात्मे धारातीर्थी पडले. कुठे फटके लगावले, कुठे छडीमार दिला. पंधरा-वीस हजार सत्याग्रही स्वातंत्र्याचा जयजयकार करीत, गांधीजींचा जयजयकार करीत तुरुंगात गेले!

शेणामेणाच्या माणसांतून केवढी ताकद गांधीजींनी निर्माण केली होती! अपूर्व शक्ती, अपूर्व लढाई आणि अपूर्व नेता! सारे जग हा प्रकार पाहून स्तिमित झाले! अहिंसक सत्या-ग्रहातली शक्ती पाहून दिपले.

उर्मट साम्राज्यशाहीलाही विचार करावा लागला. सप्रू-जयकर यांनी गांधीजी व सरकार यांच्यामध्ये समेट घडवून आणला. २६ जानेवारी १९३१ रोजी, गांधीजी व अन्य नेते तुरुंगातून सुटले. वाटाघाटींसाठी दिल्लीला गेले. व्हॉइसरॉयशी

बोलणी सुरू झाली. मध्यरात्रीपर्यंत वाटाघाटी चालत. शेवटी दारू व परदेशी कापडावर निरोधन करण्याचा हिंदी जनतेचा हक्क सरकारने मानला. स्वतःच्या उपयोगासाठी निसर्गनिर्मित मीठ नेण्यासही मुभा मिळाली. काही गोष्टी सरकारने मानल्या, काही मानल्या नाहीत. वाटाघाटीमध्ये देवाण-घेवाण होणारच. गांधीजी म्हणाले, " ख्रिस्ताचे पर्वतावरील प्रवचन आठवून मी त्या वृत्तीने तडजोड केली. "

★

## हरिजनांसाठी

भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र स्वरूप धारण करीत होता. स्वातंत्र्याची तहान आता किरकोळ स्वरुपाच्या सुधारणांनी वा सवलतींनीं भागणार नव्हती. ब्रिटिश सत्तेविरुद्ध सर्वसामान्य जनतेच्या मनात अनादर, असंतोष उत्पन्न झालेला होता. धूर्त ब्रिटिशांनी ही परिस्थिती जाणली होती आणि म्हणूनच जनतेची फसवणूक करण्याचे व तिच्यात फूट पाडण्याचे निरनिराळे डाव ते टाकीत होते.

गोलमेज परिषद हा असाच एक प्रयत्न. हिंदी जनतेसाठी आपण काही तरी करीत आहोत हे दाखवून जनतेला भुलवण्याचा डाव. या परिषदेस हिंदुस्थानातील निरनिराळ्या

पक्षांचे, वृत्तीचे व गटाचे नेते सरकारने लंडन येथे बोलाविले होते.

१९३१ सालची कराचीची काँग्रेस झाली नि या परिषदेस गांधीजींनी काँग्रेसतर्फे उपस्थित रहावे असे ठरले. त्याला अनुसरून गांधीजी लंडनला बोटीने निघाले. गांधीजींना बोटीवर अनेक लोकांनी अनेक प्रश्न विचारले. डेकवर सूत कातताना गांधीजी त्या सर्वांना प्रेमभावनेने उत्तरे देत. या परिषदेबद्दल ते म्हणाले होते, "हिंदी पुढारी आणि ब्रिटिश मंत्री यांच्यांत होणाऱ्या या वाटाघाटींमधून काही निष्पन्न होईल, अशी फारशी आशा वाटत नाही. ब्रिटिश आणि आम्ही यांच्यात समझोता व्हावा असा कसोशीचा प्रयत्न मात्र मी करीन. माझा सत्यावर संपूर्ण विश्वास आहे. अंतिम विजय सत्याचाच होईल, याच एका विश्वासाने मी चाललो आहे."

लंडनच्या गार हवेतही गांधीजींनी आपला वेष बदलला नाही. तोच ढोपराएवढा पंचा आणि काठी. ते म्हणाले, "माझा हिंदुस्तान असाच आहे. अर्धनग्न, अर्धपोटी. मी त्या दरिद्री नारायणाचा प्रतिनिधी म्हणून चाललो आहे."

आणि गांधीजी उतरलेदेखील लंडनमधील गरीब लोकांच्या वस्तीत. मोठमोठ्या नजरा त्यांच्याकडे लागलेल्या होत्या, पण ते मिसळले लहान लहान मुलांत.

गोलमेज परिषदेत मुसलमानांचे व अस्पृश्यांचे प्रतिनिधी होते. गांधीजी मुस्लिम ऐक्यासाठी सदैव प्रयत्नशील असत. परिषदेत मुस्लिमांच्या अवास्तव मागण्या ऐकून देखील ते

म्हणाले, " तुमच्या सगळ्या मागण्या मी मान्य करतो, पण मग ब्रिटिशांनी स्वराज्य नाकारले तर माझ्या खाद्यांशी खांदा लावून त्यांच्याविरुद्ध लढाल का ? "

गांधीजींनी मुस्लिमांच्या व इंग्रजांच्या मर्मावर नेमके बोट ठेवले होते. दोघांचेही पितळ उघडे पडले होते.

परंतु अस्पृश्यांच्या प्रश्नांवर मात्र गांधीजींना नमते घ्यावे लागले. ते आंबेडकरांना उद्देशून म्हणाले, " आंबेडकरांना माझ्यावर थुंकण्याचाही अधिकार आहे; कारण सवर्ण हिंदूंनी आजवर केलेल्या पापाचा भार माझ्या शिरावर आहे. "

गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे गोलमेज परिषदेतून काहीही फलनिष्पत्ती झाली नाही. गांधीजी अखेरीस म्हणाले, " माझे व तुमचे मार्ग भिन्न आहेत. उद्या कसल्या वादळाला तोंड द्यावे लागणार आहे, देवास ठाऊक. "

आणि घडलेही तसेच. काही दिवसांनंतर गांधीजी जेव्हा परत मायदेशी आले तेव्हा सरकारी अत्याचारामुळे देशात असंतोष पसरलेला होता. जवाहरलालजींना तुरुंगात टाकले होते. वातावरण तापलेले होते आणि केव्हा भडका उडेल याचा नेम नव्हता. म्हणून गांधीजींचे स्वागत करण्याचा समारंभही करण्यात आला.

देशामधली ही स्थिती लक्षात घेऊन वातावरणातला ताण कमी करता आल्यास अनर्थ टळेल या उद्देशाने गांधीजींनी व्हॉईसरॉयना तार धाडून भेटीची इच्छा प्रदर्शित केली. परंतु साधे उत्तर धाडण्याचे सौजन्य साहेबांनी दाखविले नाही.

हा केवळ गांधीजींचाच अपमान नव्हता तर कोट्यवधी भारतीय जनतेचा होता. तथापि क्षमाबुद्धीने गांधीजींनी तोही गिळला आणि काही दिवसांनी पुन्हा दुसरी तार धाडली. गांधीजींनी लिहिले होते, "माझ्या विनंतीला आपण धुडकावून लावले ही शोचनीय गोष्ट आहे. माझ्या सूचनेवर विचार करण्याऐवजी आपण तिची दखल घेतली नाही. मी पुनश्च विनंती करतो की, जनतेच्या भावना लक्षात घेऊन आपण न्याय द्यावा. अहिंसेवर माझी नितांत श्रद्धा आहे. हिंसक कृत्यापासून दूर रहावयाचे असेल तर शांतिपूर्ण असहयोग हाच एकमेव मार्ग आहे असा माझा विश्वास आहे."

परंतु गांधीजींच्या या आवाहनाला उत्तर काय मिळाले? तर ता. ४ जानेवारी १९३१ रोजी, गांधीजींनाच सरकारने अटक केली. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनाही तुरुंगात धाडले. पुनः देशभर अशांती माजली. लोकांनी ठिकठिकाणी विदेशी मालावर बहिष्कार टाकला. परदेशी कापडांच्या होळ्या पेटवल्या. दारूगुत्यांवर निरोधन सुरू केले. चळवळीचा वणवा सर्वत्र पसरला. सरकारने फार मोठ्या प्रमाणावर धरपकड केली. सुमारे ऐंशी हजार लोक स्वार्थावर तिलांजली सोडून देशासाठी कैद भोगण्यास तुरुंगात गेले.

'फोडा आणि झोडा' हे ब्रिटिश राजनीतीचे प्रमुख सूत्र होते. हिंदु-मुस्लीम फूट त्यांनी पाडलीच होती. आता सर्वच हिंदूपासून अस्पृश्यांना दूर काढण्याचे कुटिल कारस्थान त्यांनी रचले होते. अस्पृश्यांना विधानसभेत स्वतंत्र स्थान देण्याचे

वचन त्यांनी दिले. जातीय मसुदा प्रसिद्ध केला. हिंदू व मुसलमान अस्पृश्यांना पायदळी चिरडण्याचा प्रयत्न करीत आहेत अशी अस्पृश्यांची भावना त्यांनी करून दिली. अस्पृश्यांचे पुढारी ब्रिटिशांच्या डावाला भुलले. त्यांनी जातीय मसुद्याला मान्यता दिली.

हा खरा प्रकार पाहून गांधीजी बेचैन झाले. " अस्पृश्यांना आम्ही माणुसकीला पारखे केले हा आमचा दोष, आमचे पातक आम्ही धुवून काढू, पण परकीयांच्या कुटिलपणाने त्यांना आम्ही कायमचे आमच्यापासून दूर लोटणार नाही. कितीही झाले तरी ते आमचेच बांधव आहेत. "
गांधीजी म्हणाले आणि सरकारने रचलेल्या कृष्णकृत्याविरुद्ध येरवड्याच्या बंदीशाळेतच उपोषण आरंभिले. २० सप्टेंबर १९३२ चा तो दिवस. गांधीजींच्या उपोषणाची वार्ता सर्वत्र पसरली. सरकारचे ताठर धोरण नि गांधीजींचा आत्मक्लेशाचा मार्ग, यांतून काय निघणार ? देश काळजीने काळवंडला. नेते हवालदिल बनले. धावपळ सुरू झाली. सरकार म्हणाले, " आंबेडकर आणि तुम्ही पाहून घ्या. "

मध्यस्थांनी वाटाघाटी घडवून आणल्या. रवींद्रनाथ येरवड्यास आले. शेवटी देवाण-घेवाण होऊन समेट झाला. मॅकडोनल्ड साहेबांची तार आली. जातीय मसुदा मागे घेतला गेला आणि २६ सप्टेंबरच्या सायंकाळी गांधीजींनी उपवास सोडला. राष्ट्राने निःश्वास टाकला. गांधीजींचे मोलाचे प्राण वाचले होते. राष्ट्राचे धन सुरक्षित राहिले होते.

या घटनेमुळे हरिजनांच्या प्रश्नांकडे देशाचे लक्ष वेधले गेले. याचे गांभीर्य जाणवले. अस्पृश्योद्धाराच्या कार्याला चालना मिळाली. कुठे पाणवठे खुले झाले, कुठे मंदिरे उघडली. गांधीजींनी विचार केला की या कार्याला निधी तर हवाच. तो जमवता येईल, कुणी धनिकही देतील, परंतु या सर्व भांडवलात आध्यात्मिक भांडवलाची गरज फारच आहे; आणि त्यांनी एकवीस दिवसांचे उपोषण करण्याचे ठरविले. सरकारने त्यांची मुक्तता केली. ८ मे १९३३ पासून गांधीजींचे हरिजनांसाठी उपोषण सुरू झाले. "मी माझ्या उपवासाने आध्यात्मिक भांडवल जोडीत आहे."—गांधीजी म्हणाले.

या अग्निदिव्यातून गांधीजी सुखरूप पार पडावेत म्हणून देशभर प्रार्थना झाल्या. आणि अखेरीस गांधीजींचे दिव्य यशस्वीरीत्या संपले. गांधीजींनी साबरमतीचा आश्रम हरिजन कार्यासाठी समर्पित केला. 'हरिजन' साप्ताहिक सुरू केले. हरिजन कार्यासाठी भारतव्यापी दौरा काढला.

# व्रतनिष्ठा

हरिजन उद्धाराच्या कार्यात गांधीजी रमून गेले. कोठल्याही कामात समर्पण वृत्तीने सहभागी व्हायचे, अशीच त्यांची वृत्ती होती. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत दौरा करताना सर्वत्र काही सारखेच अनुभव आले नाहीत. अनेक वर्षांची रूढी मोडून तोडून टाकण्यासाठी गांधीजी हिंडत होते. सनातनी म्हणवून घेणारे आंधळे धर्मनिष्ठ विरोध करण्यास उठले. पुण्यात विरोध झाला. गांधीजींच्या मोटारीवर बॉंब टाकण्याचाही प्रयत्न झाला. कुठे काळ्या निशाणांनी स्वागत झाले. कुठे निषेधाला तोंड द्यावे लागले. परंतु गांधीजींची आपल्या कार्यावरची श्रद्धा अढळ होती.

जगन्नाथपुरीची गोष्ट. पवित्र क्षेत्र. तेथल्या मुक्कामात कस्तुरबा व महादेवभाई जगन्नाथाच्या दर्शनाला गेले. ज्या मंदिरात हरिजनांना प्रवेश नाही त्या मंदिरात जायचे नाही असा गांधीजींचा दंडक होता. तेव्हा त्यांना जेव्हा हे कळले तेव्हा ते रागावले. त्यांना हे आवडले नाही.

गांधीजीच एकदा म्हणाले होते, “जन्माने मी वैश्य आहे, स्पृश्य आहे; परंतु स्वतःला मी अस्पृश्य समजणेच पसंत करतो.”

या दौऱ्यात गांधीजींनी सुमारे आठ लाख रुपये हरिजन कार्यासाठी जमविले. ‘हरिजन सेवक संघा’ची स्थापना केली. ठक्करबाप्पासारख्या थोर सेवकाच्या हाती संघाची सूत्रे दिली. सर्व देशभर गावोगावी ‘हरिजन सेवक संघ’ काम करू लागले. एका महत्त्वाच्या समाजसेवेकडे लोकांचे लक्ष वेधले गेले. जुनाट, रूढीग्रस्त अमानुषीय चुकीचा दृष्टिकोन निवळण्यास सुरुवात झाली.

१९३४ साली गांधीजींनी वर्ध्याजवळ शेगाव येथे आपला आश्रम स्थापला. ‘सेवाग्राम’ म्हणून हेच ठिकाण ओळखले जाते. सेवाग्राम आश्रमात गांधीजींनी नाना तऱ्हेच्या विधायक कामांची सुरुवात केली. खादी, ग्रामोद्योग, नयी तालीम, कृषि आदी विविध क्षेत्रांत प्रयोग सुरू झाले. ग्रामीण जीवनाचे बारकाईने निरीक्षण करून ग्रामीण अर्थशास्त्र निर्माण केले. शेतीप्रधान खेड्यांना ग्रामोद्योग तारतील हे लक्षात आल्यावर गांधीजींनी विविध ग्रामोद्योगांवर भर देऊन त्यांचा प्रसार केला.

गांधीजींचे जीवन मधमाशीसारखे होते. प्रत्येक क्षणी मिळेल तेथून ज्ञानाचे मधुकण ते गोळा करीत असत. नानाविध अनुभवांनी त्यांचे व्यक्तित्व समृद्ध बनलेले होते.

गांधीजींच्या मोठेपणातले एक रहस्य होते. ते म्हणजे कुठलाही विचार त्यांना पटला की तो त्वरित आचरणात आणीत असत. गांधीजी महान कृतिवीर होते. कोरडे उपदेशक नव्हते.

हरिजनांची दररोजची कमाई किती हे पाहून त्यांनी स्वतःचाही खर्च तेवढाच ठेवला. मित्रांनी, हितचिंतकांनी फळफळावळांची भेट दिली तर त्या वस्तूंची किंमत ठरवून ती दुसऱ्या दिवशीच्या आपल्या खुराकामधून ते कमी करीत असत.

अनासक्त जीवन बनविण्याकडेही त्यांचे लक्ष असे. ते काटकसरी तर होतेच. त्यांना येणाऱ्या पत्रांची पाकिटे, तारा आदी कागदांचाही उपयोग चिठ्या लिहिण्यासाठी ते करीत असत.

एक लहानशी हरिजन मुलगी त्यांनी सांभाळली होती. स्वतःच्या मुलासारखे त्यांचे तिच्यावर प्रेम होते. एकदा खेळत असताना तिच्या हातून एक आरसा फुटला ती घाबरली. बापू काय म्हणतील ? रडत रडतच ती गांधीजींच्या कडे गेली. "काय झालं बेटी ?" गांधीजींनी तिला जवळ घेऊन विचारले.

"माझ्या हातून हा आरसा फुटला, बापूजी."

"अग, मग रडायला काय झालं ? हे पाहा, हा आरसा आणि हे साबणसुद्धा नदीत टाकून देतो. करायचं काय आपल्याला ? हजारो गरीब शेतकरी कुठं आरसा आणि साबण वापरतात !"

ज्या वस्तूंची गरज नाही अशा वस्तू जवळ बाळगायच्या नाहीत हे त्यांच्या साध्या राहणीतले मुख्य सूत्र होते.

गोलमेज परिषदेला लंडनला जातानाची गोष्ट. त्यांच्या-बरोबर महादेवभाई देसाई आदी त्यांची सेक्रेटरी मंडळी होती. त्यांनी मित्रांच्या सांगण्यावरून भरपूर लोकरीचे कपडे व अन्य वस्तू पेटाऱ्यांतून घेतल्या होत्या. हे सारे वैभव पाहून गांधीजी रागावले. म्हणाले, “खादी भांडारातून चार लोकरीचे व व सुताचे तुकडे घेतले असते म्हणजे पुरले असते. जणू काय पाच वर्षे इंग्लंडला आपल्याला राहावयाचे आहे अशा कल्पनेने तुम्ही हा सोस केलात. तुम्ही या कातडी पेट्या घेतल्यात. यावरूनच तुमची दारिद्र्याविषयी व असंग्रहाविषयी काय कल्पना आहे हे मला समजले. तुम्ही म्हणता काही वस्तू जुन्या आहेत आणि त्या मित्रांच्या अनावश्यक संग्रहातील आहेत. तुम्ही एकतर मला फसवता किंवा स्वतःला तरी फसवता, जर मित्रांना त्या वस्तू नको होत्या, तर त्यांनी त्या टाकून द्यावयास पाहिजे होत्या....तुम्ही सिमल्यात जसे राहता तसे लंडनमध्ये राहिले पाहिजे. सिमल्याला जर धोतर, कुडता व चप्पल चालते तर इंग्लंडला का चालू नये ?”

गांधीजींच्या या कडक टीकेनंतर बरेचसे सामान एडनहून परत हिंदुस्तानात धाडण्यात आले.

हरिजन कार्यासाठी देशव्यापी दौरा काढला त्यावेळची एक हकिकत. गडबडीत गांधीजी हातरुमाल कोठेतरी विसरले. पुढच्या एका मुक्कामावर त्यांनी ‘रुमाल कोठे आहे’ म्हणून विचारले. महादेवभाईंनी सांगितले, “बापू, तो रुमाल कुठेतरी हरवला आहे. दुसरा देतो.”

"नको नको" गांधीजी म्हणाले, "तो रुमाल आणखी चार महिने गेला असता. मग मी आता चार महिने रुमालच वापरणार नाही."

पुढे गांधीजींनी रुमाल न वापरून झालेले नुकसान भरून काढले आणि स्वतःच्या विसराळूपणाचीही शिक्षा घेतली.

नोआखलीतल्या शांतियात्रेच्या वेळची एक आठवण मनुबहेन गांधींनी लिहिली आहे: नोआखलीत नारायणपूर नावाचे एक गाव आहे. तेथे रोजच्याप्रमाणे सात वाजता गांधीजी पोचले. आंघोळीच्या तयारीच्या वेळी गांधीजींचा अंग घासण्याचा खडबडीत दगड नाही हे मनुबहेनच्या लक्षात आले. गांधीजी कधी साबण वापरीत नसत, एक खडबडीत दगड वापरीत असत. मीराबहेननी दिलेला हा दगड खूप वर्षे त्यांच्याजवळ होता. मनुबहेननी विचारले, "बापूजी मी अंग घासण्याचा दगड कोठेतरी विसरून आले. कदाचित काल विणकराच्या घरी राहून गेला असावा. आता मी काय करू?" "चूक तर केली आहेसच. पण माझी इच्छा आहे की तो तू स्वतःच जाऊन शोधून आणावास. एकटीच जा. म्हणजे दुसऱ्या वेळी लक्षात राहील."

मनुबहेन एकटीच निघाली. नारळी-पोफळीची दाट वने तुडवीत. रस्त्यावर मुसलमान गुंडांची वस्ती. जातीय दंगलीचा तो काळ. रामनाम जपत ती एकदाची विणकाराच्या घरी आली. विणकराच्या म्हातारीने तो दगड दिला होता फेकून घराबाहेर. मनूने तो कसाबसा शोधला नि झपझप परतली. गांधीजींच्या

पुढ्यात तो दगड तिने ठेवला आणि तिला रडूच कोसळले. गांधीजी म्हणाले, "आज तुझी परीक्षा झाली. ईश्वर करतो ते भल्यासाठीच. माझ्या यज्ञात यायचे म्हणजे फार हिंमतीचे काम आहे. दगडाच्या निमित्ताने मी तुझी परीक्षा पाहिली, तीत तू उत्तीर्ण झालीस. मला याचा आनंद झाला. हा दगड माझा पंचवीस वर्षांचा बाळगलेला मित्र आहे. तुरुंगात गेलो किंवा महालात गेलो तरी हा दगड बरोबरच फिरला आहे. प्रत्येक उपयोगी वस्तूला जपायला हवं."

निसर्गोपचारावर त्यांची निष्ठा होती. पण उपचार हा वरवरचाच. खरे औषध रामनाम, अशी त्यांची श्रद्धा. एका आजाऱ्याला त्यांनी लिहिले होते, "रामबाण असे औषध जगात एकच आहे व ते म्हणजे रामनाम. पण एवढे सोपे औषध तरी आपणां सर्वांना कोठे घेता येते?" गांधीजींची रामनामावरची ही अढळ श्रद्धा अंतिम क्षणापर्यंत जागृत होती.

अस्वाद व्रताचे आचरण गांधीजी स्वतः करीत आणि आपल्या सहकाऱ्यांना करायला लावीत. अस्वाद म्हणजे जिभेचे चोचले न पुरविता अन्न भक्षण करणे. आश्रमातील जेवण अतिशय साधे असे. निरनिराळ्या प्रकारचे चविष्ट अन्न करण्याचे टाळीत. साधेच अन्न परंतु भूक लागेल तेव्हा भरपूर खाल्ल्याने माणसाची प्रकृती उत्तम राहते असे त्यांचे मत होते.

वेळेचा अपव्यय करणे त्यांना मुळीच आवडत नसे. सतत उद्योग चालू असे. तसेच दिलेली वेळ पाळण्यातही ते दक्ष

असत. साबरमतीची गोष्ट. एकदा गांधीजी काही कामासाठी अहमदाबादला गेले. तेथे थोडा वेळ लागला. त्यानंतर त्यांना एका सभेला जायचे होते. झपझप निघाले. वाटेत सायकल-वरून एक आश्रमवासी चाललेला दिसला. त्यांनी त्याला थांबवले. त्याच्या जवळची सायकल घेतली नि सायकलवरून ठरलेल्या वेळी सभेच्या जागी हजर झाले.

नोआखलीत गांधीजींची शांतियात्रा सकाळी बरोबर सातला सुरू होई. सातावर दोन मिनिटे झाली तरी त्यांना वाईट वाटे. एकदा सामान आवरायला वेळ लागला. त्यामुळे पाच मिनिटे जास्ती गेली. बाहेर लोक थांबले होते. गांधीजी मनूला म्हणाले, "बघ, बाहेर केव्हाचे लोक उभे आहेत. या पाचशे माणसांची पाच मिनिटे तू चोरलीस असे म्हटले पाहिजे."

गांधीजी केलेल्या प्रतिज्ञेपासून वा घेतलेल्या व्रतापासून ढळत नसत. मात्र त्यात काही चूक आहे, किंवा ते अनीति-युक्त आहे असे त्यांना पटले तर मात्र तेवढ्याच तडफेने ते त्याचा त्याग करायला मागेपुढे पाहात नसत. परंतु जोपर्यंत आपला मार्ग अनीतियुक्त आहे असे त्यांना वाटत नसे तोपर्यंत ते बारीकसारीक गोष्टीतसुद्धा बदल करीत नसत. फिरायला जायचा रस्ता एकच, झोपण्याची जागा तीच. खाण्याची ठरलेली भांडी तीच आणि वस्तूही त्याच.

सत्य–अहिंसेवरील गांधीजींची निष्ठा अपूर्व होती. त्यांच्या सर्व कर्माला सत्याची बैठक असे, अहिंसेचे कोंदण असे.

जीवनालाच त्यांनी ‘ सत्याचे प्रयोग ’ असे म्हटले, त्यांच्या आत्मकथेचे शीर्षकच ते आहे. सत्याविषयी एके ठिकाणी ते म्हणतात, “ सत्य हाच माझा सर्वोत्तम धर्म आणि त्यात सारे धर्म सामावतात. सत्याचा अर्थ केवळ वाचिक सत्य नव्हे, तर वैचारिक सत्य सुद्धा त्यात येते. सत्य म्हणजे सापेक्ष सत्य नव्हे; पण नित्य, शुद्ध, सनातन आणि अपरिवर्तनशील सत्य —त्यालाच ईश्वर म्हणतात. ईश्वराच्या पुष्कळ व्याख्या आहेत; कारण ईश्वराची अनेक स्वरुपे आहेत. या व्याख्या ऐकून मी आश्चर्यचकित होतो आणि कुंठित होऊन जातो. परंतु ईश्वराची मी सत्यावताराच्या स्वरूपात पूजा करतो. मी ईश्वराला अद्यापी प्राप्त केलेले नाही, परंतु मी त्याच्या शोधात आहे. या शोधात माझा नाश करून घेण्याची तयारी आहे. जोपर्यंत मला पूर्ण सत्य हस्तगत झालेले नाही तोपर्यंत मी ज्याला सत्य मानतो त्या सत्याचे मी पालन करतो. सत्याचा मार्ग विकट आहे आणि वस्तऱ्याच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण आहे. तथापि मला हा मार्ग सुलभ वाटतो. मी सत्याचा मार्ग सोडला नाही या जाणिवेने माझ्या हिमालयाएवढ्या चुकांनींही माझ्या मनाला क्लेश होत नाहीत. ”

अहिंसेविषयी गांधीजी लिहितात, “ अहिंसा हा सत्याचा पाया आहे. सत्याला जर अहिंसेचा आधार नसेल तर सत्याचे पालन असंभवनीय आहे; असा माझा विश्वास आहे. अतितृष्णा सोडा, शेजाऱ्याची सेवा करावयास शिका, व्यवहारात सत्यता पाळा, सहिष्णू बना, ईश्वरावर विश्वास ठेवा, लोभामुळे

कोणावरही आक्रमण करू नका. कोणी दुष्टपणाने तुमच्यावर आक्रमण केले तर त्याला न मारता स्वतः मरायला शिका. भ्याडपणा आणि अहिंसा एक नव्हेत. शौर्याच्या परिसीमेलाच अहिंसा हे दुसरे नाव आहे. बलवानच क्षमा करू शकतो."

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह ।
शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन ॥
सर्वधर्मसमानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना ।
विनम्र व्रतनिष्ठासे ये एकादश सेव्य है ॥

गांधीजींनी या व्रतांनी आपले थोर जीवन घडविले.



# चले जाव

१९३४ साली काँग्रेसचे अधिवेशन मुंबईत भरले होते. याच अधिवेशनात गांधीजींनी काँग्रेस संस्थेतील अधिकार-पद किंवा सभासदत्वही सोडले. गांधीजी वृत्तीने खरेखुरे लोकशाहीनिष्ठ होते. एखाद्या माणसाच्या प्रभावाखाली एखाद्या संस्थेने खूप दिवस वाटचाल करणे बरोबर नाही, त्यात हुकूम-शाहीचा धोका असतो. शिवाय संस्थांचा, अधिकारपदांचा, मानसन्मानांचा मोह गांधीजींच्या ठायी नव्हता. जनसेवेसाठी सेवेची भावना अंतःकरणात असली म्हणजे पुरे.

गांधीजींनी काँग्रेसचे दैनंदिन काम जरी सोडले तरी, काँग्रेसश्रेष्ठींना वेळोवेळी सल्ला देत असतच.

१९३७ साली देशभर सार्वत्रिक निवडणुकी होण्याचे इंग्रज सरकारने घोषित केले. गांधीजींनी ह्या निवडणुकांमध्ये भाग घेऊन विधिमंडळात जाऊन काँग्रेसने देशसेवा बजावावी असा सल्ला दिला. काँग्रेसने निवडणुकी लढविल्या. काही प्रांतांत बहुमत मिळवून मंत्रिमंडळेही बनविली व राज्यकारभार हाती घेतला. गांधीजींच्या शिकवणुकीनुसार ही सरकारे कामकाज पाहू लागली. कायदे बनवू लागली. दारूबंदी, अस्पृश्यता-निवारण, जमीनसुधारणा अशी जनहिताची अनेक कामे सरकारी पातळीवर सुरू झाली.

१९३९ साली युरोपमध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. महायुद्धाच्या झळांनी ब्रिटिश राष्ट्र पोळून निघू लागले. भारताचे सहकार्य त्यांनी गृहित धरूनच भारताला युद्धात गोवून टाकले. वास्तविक युद्धप्रयत्नांमध्ये सहकार्यासाठी त्यांनी हिंदी पुढाऱ्यांशी विचारविनिमय आधी करावयास हवा होता. पण त्यांनी एवढे सौजन्य दाखविले नाही. म्हणून गांधीजींच्या संमतीनेच ठिकठिकाणच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजिनामे देऊन सत्तात्याग केला.

हिंदी जनतेचे सहकार्य हवे असेल तर राष्ट्रीय सरकारची मागणी पुरी करावी अन्यथा हिंदी जनतेचा ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांस विरोध राहील असे गांधीजींनी जाहीर केले. आणि हा युद्धविरोध परिणामकारकरीत्या नोंदविण्यासाठीच त्यांनी १९४० साली वैयक्तिक सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले.

गांधीजींनी याच वेळी आपले पहिले सत्याग्रही म्हणून आचार्य विनोबाजी भावे यांची निवड केली. या सत्याग्रहात भाग घेणाऱ्या सत्याग्रहींसाठी गांधीजींनी काही कसोट्या ठेवल्या होत्या व त्यानुसारच देशभरचे सत्याग्रही निवडले जात.

शत्रूवरती संकट म्हणजे आपली सुवर्णसंधी ही राजनीती गांधीजींना मान्य नव्हती. म्हणूनच त्यांनी इंग्रजांच्या मार्गात अडचणी उपस्थित होतील अशी चळवळ यावेळी आपणहून केली नाही. उलट युद्धाच्या स्फोटककाळीही देशात शांतता राखून जनतेवर आपला केवढा प्रभाव आहे हेच दाखवून दिले. इंग्रज अडचणीत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात

भ्याडपणा आहे असे ते मानीत असत. त्यांना स्वराज्यापेक्षाही सत्याग्रह अधिक प्रिय होता. आणि शुद्ध सत्याग्रहीच्या आचरणातूनच स्वराज्याची सेवा चांगल्याप्रकारे होईल, असे त्यांना वाटे.

परंतु कुटिल राजनीतीत मुरलेल्या इंग्रजांनी गांधीजींच्या सद्भावनेचा योग्य तो आदर त्यावेळी तरी केला नाही. वर्ष-दीडवर्ष सत्याग्रहाचे पर्व सुरू राहिले. तिकडे महायुद्धाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत होती. जर्मनीचा हुकूमशहा हिटलर एकामागून एक देश गिळंकृत करीत ब्रिटनच्या रोखाने पुढे पुढे कूच करीत होता. इंग्रजांचे साम्राज्य हादरून गेले होते. आशियाखंडात जपान तशीच मुसंडी मारीत होता. भारताच्या वेशीवर युद्ध येऊन ठेपले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताबाहेर "आझाद हिंद" फौज उभारली होती. 'जय हिंद–चलो दिल्ली' ही वीरगर्जना घुमवीत भारतीय जवान नेताजींच्या नेतृत्वाखाली भारताला मुक्त करण्यासाठी सज्ज झाले होते. इंग्रजी राजवटीला चोहोबाजूंनी धोका निर्माण झाला होता. संकटाच्या कृष्णछायांनी ब्रिटिश सत्ता काळवंडून गेली होती.

अशावेळी खंडतुल्य भारताचे अंतःकरणपूर्वक सहाय्य मिळविण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना हिंदी नेत्यांशी वाटाघाटी करण्यासाठी एक योजना देऊन १९४१ साली भारतात धाडण्यात आले. 'क्रिप्स योजना' म्हणूनच ती इतिहासात ओळखली जाते. वाटाघाटींसाठी हिंदी नेत्यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले.

क्रिप्स योजनेवर वाटाघाटी करण्यासाठी गांधीजी गेले, पण त्यांची निराशा झाली; कारण युद्धानंतर इंग्रज सरकार भारतीय जनतेला कोणकोणते हक्क देईल एवढेच त्यात होते. त्वरित काही करण्यास ते मुळीच तयार नव्हते. गांधीजी क्रिप्ससाहेबांना म्हणाले, “आपल्यासारख्याने अशी योजना आणायला नको होती.”

जवाहरलाल, वल्लभभाई, मौलाना आझाद आदी काँग्रेसच्या नेत्यांनींही क्रिप्ससाहेबांशी वाटाघाटी केल्या, पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. ब्रिटिश सरकार स्वतःचा स्वार्थ सोडून कोट्यवधी हिंदी जनतेचा स्वातंत्र्याचा न्याय्य हक्क मान्य करण्यास अद्याप तयार नव्हते. उलट नवनवीन वट-हुकुमांच्या खाली गरीब जनतेची मुस्कटदाबी करीत होते. भारत संरक्षण कायद्याच्या वडग्याखाली भाषण व लेखन-स्वातंत्र्यदेखील हिरावून घेतलेले होते. महायुद्धामुळे वस्तूंची टंचाई व महागाई वाढतच होती. लोक संत्रस्त बनले होते.

गांधीजींनी सहकार्यासाठी मित्रत्वाच्या नात्याने पुढे केलेला हात इंग्रजांनी झिडकारला होता. गांधीजी विचारमग्न बनले. स्वस्थ बसून भागणार नव्हते. अन्याय सहन करणे शक्य नव्हते. सेवाग्रामच्या कुटीकडे भारतीय जनतेचे लक्ष लागून राहिले होते. वातावरण तापत चाललेले होते. लहान-मोठे काँग्रेसचे नेते गांधीजींशी विचारविनिमय करीत होते.

गांधीजी आता या परिस्थितीतून कसा मार्ग काढणार ?


कोणता आदेश राष्ट्राला देणार? काय करावे लागणार?.... राष्ट्र अधीरतेने पाहात होते.

आणि गांधीजी खूपशा विचाराअंती निर्णयावर आले की, स्वातंत्र्याची अंतिम लढाई लढण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. लढ्याशिवाय आता गत्यंतरच नाही. त्यावेळची गांधीजींच्या मनाची अवस्था त्यांच्या उद्गारातून दिसून येते. ते म्हणाले होते, "माझी झोप उडाली आहे. मला काही सुचत नाही. जोवर महायुद्ध सुरू आहे तोवर चळवळ नको असे माझे मत होते; परंतु या देशाचे होणार तरी काय? आत आणि बाहेर दोन्हीकडे शत्रू. अशावेळी आपले सरकारच हवे आहे. जगभर हिंसेचा डोंब उसळलेला असताना मी काय केवळ पहात स्वस्थ बसू? माझ्या अहिंसेत जर काही ताकद असेल तर ती याच वेळेस प्रकट होऊ दे!"

काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाची बैठक वर्ध्याला भरली होती. गांधीजींनी आपले विचार मांडले, 'ब्रिटिशांनी तावडतोब हिंदुस्तानला स्वातंत्र्य देऊन येथून जावे' असा निर्वाणीचा इषारा देणारा ठराव तेथे झाला. ऑगस्ट १९४२ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसची बैठक झाली. ७ ऑगस्टपासून देशाचे लक्ष मुंबईकडे केंद्रित झाले होते. ८ ऑगस्ट रोजी गांधीजींचे देशाला उद्देशून धीरगंभीर भाषण झाले. 'चले जाव'चा ऐतिहासिक महत्त्वाचा ठराव पास झाला. 'करा अथवा मरा' असा आदेश गांधीजींनी दिला. 'उद्यापासून तुम्ही स्वतंत्र आहात' गांधीजींनी हिंदी जनतेला

सांगितले, आणि नवचैतन्याची एक प्रमत्त लाट देशभर उसळली. तशात ब्रिटिशांनी ९ तारखेस गांधीजींसह सर्व थोर काँग्रेसश्रेष्ठींना अटक केली. गावोगाव धरपकडीचे सत्र सुरू केले. ब्रिटिशांची कल्पना अशी की या दहशतीमुळे चळवळ थंडावेल. ठिकठिकाणचे नेते कारागृहात डांबले म्हणजे काही होणारच नाही, परंतु घडले ते विपरीत. सारा देश या दडपशाहीच्या विरुद्ध लढण्यास सज्ज झाला. गांधीजींच्या ‘चले जाव’ या शब्दांना मंत्राचे सामर्थ्य लाभले होते. लहान मुले, तरुण-तरुणी, वृद्ध स्त्री-पुरुष, मजूर, शेतकरी, विद्यार्थी सारे भारून उठले. ब्रिटिश सत्तेला अखेरचा टोला लगावण्यासाठी जो तो आपली सर्व शक्ती वेचून, प्राणपणाने, उपलब्ध होईल त्या साधनाने साम्राज्यशाहीशी लढू लागला. भूमिगत चळवळ सुरू झाली. सरकारी कचेऱ्यांवर मोर्चे, मिरवणुकी निघाल्या. साताऱ्यासारख्या जिल्ह्यात तर प्रती सरकारची स्थापना झाली. अनेक ठिकाणी जाळपोळ, लाठीमार, गोळीबार आणि अमानुष असे अत्याचार सत्ताधाऱ्यांनी केले. भूमिगत चळवळ्यांना धरण्यासाठी मोठमोठी बक्षिसे जाहीर केली. नाना तऱ्हेचे डाव टाकले. काही जमले, काही फसले. परंतु देशातल्या सामान्य माणसानेही यावेळी जे धैर्य व देशभक्ती दाखविली ती अजोड होती. स्वातंत्र्याच्या स्फुलिंगाची, गांधीजींनी कोटयवधी स्त्री-पुरुषांच्या मनांत ज्योत प्रज्वलित केली होती. त्या पवित्र ज्योतीच्या प्रकाशातच सारे राष्ट्र, नेते तुरुंगाआड असताना, स्वातंत्र्याची वाटचाल करीत

राहिले. एक अभूतपूर्व शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि स्वातंत्र्याची लालसा यावेळी प्रकट झाली ! एवढी प्रबळ, शस्त्रसज्ज साम्राज्यशाहीदेखील गडबडली; गोंधळली; विवेकशून्य बनली. दडपशाहीला उधाण आले. पण तेवढ्याच जिद्दीने, ईर्षेने स्वातंत्र्यभक्तांनीही तोंड दिले. कित्येक तुरुंगांत गेले. लाठीमारात जबर जखमी झाले, तर कितींनी बलिदानही केले. फासावर चढले. लहान मूलही ब्रिटिश सत्तेला ' चले जाव ' सांगू लागले. एक देदीप्यमान इतिहास घडला. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात १९४२ चे स्वातंत्र्यसमर सुवर्णाक्षरांनीच लिहिले जाईल. ह्या समराचे अध्वर्यू, नेते, प्रेरणा, स्फूर्ती सारे काही होते गांधीजी !



# महात्म्याचा कारावास

९ ऑगस्ट १९४२ रोजी, गांधीजींना अटक झाली आणि त्यांना पुण्याजवळील आगाखान पॅलेसमध्ये बंदी म्हणून आणून ठेवले. त्यांच्याबरोबर कस्तुरबा व महादेवभाई देसाई होते. गांधीजींना पकडून येथे ठेवल्यानंतर कितीतरी दिवस त्यांना कुठे ठेवले आहे हे सरकारने गुप्त ठेवले होते. गांधीजी कुठे आहेत ? साऱ्यांनाच काही दिवस गूढ होते. परंतु हळूहळू त्यांच्या बंदिगृहाचा ठावठिकाणा लोकांना कळला. गांधीजीं-सारख्या नेत्याचा पत्ता का लपवून ठेवता येणार ?

गांधीजींची नित्य कार्ये कारावासातही सुरू होती. त्यांच्या अटकेनंतर देशात हलकल्लोळ माजला. ब्रिटिशांनी त्याची जबाबदारी कॉंग्रेसवर व गांधीजींवर टाकली. गांधीजींनी व्हाईसरॉयना लिहिले, 'जे अत्याचार व हिंसक कृत्ये होत आहेत त्याला आपणच जबाबदार आहात. माझा मार्ग शांतीचा व अहिंसेचा आहे, व त्यावर माझी अनन्य निष्ठा आहे. कॉंग्रेसनेही या मार्गावरील आपला विश्वास व्यक्त केलेला आहे. आपणच आम्हा सर्वांना जनतेपासून दूर केले. लोक त्यांना सुचेल त्या मार्गाने वागले आहेत, त्याची जबाबदारी कॉंग्रेसवर किंवा माझ्यावर कशी ? " लोकांना अशा अत्याचारी मार्गापासून परावृत्त करण्यासाठी कॉंग्रेसच्या नेत्यांची सुटका करा."

यावर व्हाईसरॉयने त्यांना लिहिले, आठ ऑगस्टचा ठराव मागे घ्या व देशात काँग्रेसने घडवलेल्या अत्याचारांचा निषेध करा."

गांधीजी म्हणाले, "देशात घडलेली हिंसक अत्याचारी कृत्ये काँग्रेसच्या प्रेरणेने घडली आहेत असे आपण सिद्ध केल्यावर मी म्हणाल ते प्रायश्चित घेईन. आठ ऑगस्टचा ठराव हा काँग्रेसने पास केलेला आहे. मी तो मागे घेणारा कोण ? काँग्रेस वर्किंग कमिटीचा तो अधिकार आहे. काँग्रेसच्या नेत्यांची व माझी भेट घडवा."

परंतु सरकारने गांधीजींचे काहीच ऐकले नाही. वर्किंग कमिटीच्या सभासदांना अहमदनगरच्या किल्ल्यात बंदी करून ठेवलेले होते.

सरकारची ही हटवादी भूमिका लक्षात घेऊन व सामोपचाराचे अन्य मार्ग संपल्यावर एक सत्याग्रही या नात्याने गांधीजींनी एकवीस दिवसांचे उपोषण करण्याचे जाहीर केले. सरकारला त्यांनी हा निर्णय कळविताना लिहिले, "आपण मला यथायोग्य न्याय देत नाही म्हणून सत्याग्रही या नात्याने मला अंतिम मार्ग स्वीकारावा लागत आहे. ईश्वराची इच्छा असेल तर मी या दिव्यातून पार पडेन. तुमच्या न्यायासनापेक्षा ईश्वरी न्यायासन वरिष्ठ आहे. तेथे मी न्याय मागत आहे. मला माझ्या निष्पापपणाबद्दल पूर्ण खात्री आहे."

१० फेब्रुवारी १९४३ चा दिवस उगवला आणि गांधीजींचा उपवास सुरू झाला. या गांधीजींच्या अग्निदिव्याने जगाला धक्का बसला. विचारवंतांना चिंता वाटू लागली. देश काळजीने काळवंडून गेला; कारण निष्ठुर सत्तापिपासूंना गांधीजींच्या प्राणाचे मोल काय? गांधीजींचे वय व शारीरिक ताकद लक्षात घेता हे उपोषण त्यांना कसे झेपेल, अशी शंका सर्वांनाच वाटू लागली. दररोज त्यांच्या प्रकृतीविषयीचे पत्रक प्रसिद्ध होई, त्यावरून देशाला कळे. दिवसेंदिवस प्रकृती खालावत होती. सरकार काही हालचाल करायला तयार नव्हते. उलट या उपोषणाच्या काळातच गांधीजींवर दोषारोप ठेवणारी एक पुस्तिका सरकारने प्रसिद्ध केली. हिंदी जनता गांधीजींच्या दिव्याने व्याकूळ बनली असताना पुस्तिकेवर मात्र लिहिले होते, "जनतेच्या मागणीवरूनच ही पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोत." वस्तुतः जनतेची मागणी होती, ब्रिटिश सरकारने गांधीजींची सुटका करावी, त्यांचे उपोषण थांबवावे आणि त्यांचे बहुमोलाचे प्राण वाचवावे. परंतु सरकारला त्याची फिकीर नव्हती. गांधीजींचे बरेवाईट झाले तर काय करायचे याच्या योजना सरकार आखीत होते. सरकारचे हे धोरण पसंत न पडल्यामुळे सरकारच्या निषेधार्थ व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात असलेले सर होमी मोदी, लोकनायक अणे व श्री. नलिनीरंजन सरकार या तिघांनी आपल्या सभासदत्वाचे राजिनामे दिले.

गांधीजींची प्रकृती बरीच क्षीण झाली होती. एके दिवशी

तर डॉक्टरांना नाडीही लागेना. धावपळ सुरू झाली. पण ईश्वरानेच संकट टाळले. गांधीजी या दिव्यातून सुखरूप पार पडले. राष्ट्राचा जीव भांड्यात पडला. जगभरच्या विचारवंत सुहृदांनी निःश्वास टाकला.

सरकारने मात्र उपवासाची जबाबदारी गांधीजींच्यावर आहे असे जाहीर करून आपले हात झटकले.

आगाखान महालातील बंदीवासातही गांधीजी वाचन, लेखन, सूतकताई, फिरणे, शिकणे व शिकवणे आदी कार्यक्रम पार पाडीत असत. त्यांना त्यांचा वेळ पुरत नसे, पण त्यांच्या-बरोबर असणाऱ्या इतरांना मात्र वेळ कसा काढावा याची पंचाईत पडे. गांधीजी इतरांच्या वाया जाणाऱ्या वेळेचाही विचार करीत आणि त्यांना शिकविण्यासाठी स्वतः वेळ खर्च करीत. कस्तुरबांना ते थोडा वेळ शिकवीत असत. रामायणाचा गुजराती अनुवाद करून ते त्यांना सांगत असत. डॉ. सुशीला नायर त्यांच्याजवळ होत्या. त्यांना गांधीजी संस्कृत शिकवीत असत. मादाम क्युरीचे चरित्र गांधीजींनी तेथे वाचले आणि त्याचा हिंदी अनुवाद करायला सुशीला नायरना सांगितले. गांधीजींना या संशोधक बाईबद्दल विलक्षण अभिमान होता. गांधीजी म्हणत असत “मादाम क्यूरी खरीखुरी तपस्विनी होती, तिचे ते संस्मरणीय घर पाहून यावे, असे वाटते. किती विपरीत परिस्थितीत व तुटपुंज्या साधनांनी तिने आपले कार्य केले. आमच्या हिंदी शास्त्रज्ञांनी मादाम क्यूरीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे.”

मनुबहेन गांधीला ते अंकगणित, बीजगणित, भूमिती, भूगोल, इतिहास, विज्ञान व संस्कृत शिकवीत असत. वेळ मिळेल तसा ते एकेक विषय शिकवीत. पण संस्कृत शिकवायचे कधीही सोडले नाही. मनुबहेन लिहितात, " माझ्या जीवनात गीता शिकवण्याची सुरुवातच पूज्य बापूजींनी केली. इतर विषयांचे गुरू अनेक झाले. परंतु गीतेचे गुरू बापूच राहिले. आगाखान पॅलेसमध्ये असताना फक्त गीतेच्या शब्दांचे उच्चारच होऊ शकले. नोआखलीत गीतेचा अर्थ त्यांनी समजावून सांगितला. "

या कारावासाच्या काळातच गांधीजींवर वज्राघातासारखे दोन दुःखद प्रसंग कोसळले. १५ ऑगस्ट १९४२ रोजी, त्यांचा जणू उजवा हात असे महादेवभाई देसाई गेले. सुमारे २५ वर्षे गांधीजींचा आणि महादेवभाईंचा सहवास होता. महादेवभाईंनी या महात्म्याच्या सेवेत स्वतःचे जीवन केव्हाच समर्पित करून टाकले होते. आगाखान पॅलेसमध्येच महादेवभाईंचा अंत्यविधी उरकला. तेथेच गांधीजींनी त्यांची समाधी बांधली. रोज ते त्या समाधीवर फुले वाहत असत. " महादेवच्या समाधीच्या दर्शनाने मला शांती व प्रेरणा मिळते " असे गांधीजी म्हणत असत.

२२ फेब्रुवारी १९४४ रोजी, गांधीजींच्या मांडीवर डोके ठेवून कस्तुरबांनी आपली जीवनयात्रा संपविली. महादेवभाईंच्या शेजारीच बांची समाधी बांधली. गांधीजी म्हणत, " जर पुन्हा मला पत्नी निवडायचा प्रसंग आलाच तर मी जन्मोजन्मी कस्तुरबाचीच निवड करीन. " बासष्ट वर्षांची सोबत संपली होती.

# नोआखलीतील शांतीयात्रा

गांधीजींना मलेरियामुळे वरचेवर ताप येऊ लागला. त्यांची प्रकृती ठीक राहीना. तेव्हा सरकारने त्यांची १४ मे १९४४ रोजी आगाखान पॅलेसमधून सुटका केली.

गांधीजींना प्रकृती अस्वास्थावरून सरकारने आपली सुटका करावी हे रुचले नाही. नंतर ते विश्रांतीसाठी व उपचारासाठी पुण्यास निसर्गोपचार केंद्रात राहिले.

तेथे त्यांनी सायंप्रार्थना सुरू केली. शेकडो लोक जमू लागले. प्रार्थनोत्तर प्रवचनातून ते आपले विचार मांडू लागले.

भारतीय स्वातंत्र्याच्या मागणीवर नकार देताना हिंदु-मुस्लिमांच्या प्रश्नाचा बाऊ पुढे उभा करून इंग्रज टाळाटाळ करीत. गांधीजींना वाटे हिंदु-मुस्लिम यांचे प्रश्न हे एका घरातले आहेत, आपले आपण समजुतीने सोडवले पाहिजेत, त्यात ब्रिटिश कशाला? म्हणून बाहेर आल्यावर काही दिवसांनी त्यांनी हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यास सुरुवात केली. त्यांनी मुस्लीमलीगचे प्रमुख नेते बॅ. जीना यांना पत्र लिहून आपली भावना कळवली. दोघांत बराच पत्रव्यवहार झाला. गांधीजींनी भेटीची इच्छा प्रदर्शित केली. गांधी-जीना भेट मुंबईत घडून आली. परंतु बॅ. जीनांच्या हेकट वृत्तीमुळे या वाटाघाटींतून काही फलप्राप्ती झाली नाही.

१९४५ मध्ये महायुद्धाचा शेवट झाला, हिटलरचा पराभव झाला. इंग्लंड, अमेरिका, रशिया या दोस्त राष्ट्रांचा विजय झाला. ब्रिटनचा जरी युद्धात जय झाला होता तरी त्यांचे साम्राज्य पार खिळखिळे झालेले होते. सत्तेच्या दाबाखाली दडपून ठेवलेल्या भारतासारख्या राष्ट्रात स्वातंत्र्याची आकांक्षा प्रखरपणे उदय पावलेली होती. १९४२ चा लढा, आझाद हिंद फौजेची संघटना आदी प्रयत्नांमुळेही ब्रिटिश सत्तेची मुळे हादरली होती. युद्धात जय मिळाला तरी ब्रिटनचा दर्जा घसरला होता. जागतिक राजकारणात ब्रिटन हे तिसऱ्या दर्जाचे राष्ट्र गणले जाऊ लागले होते. याच सुमारास ब्रिटनमध्ये सार्वत्रिक निवडणुकी झाल्या आणि कॉन्झर्वेटिक पक्षाच्या हातची सत्ता जाऊन ती मजूर पक्षाच्या हाती आली. चर्चिलसारखा भारतद्वेष्टा सत्तेवरून गेला आणि ॲटलीसारखा उदारमतवादी भारतस्नेही सत्तेवर आला.

हिंदुस्तानला स्वातंत्र्य देण्याची भाषा बोलली जाऊ लागली. व्हाईसरॉय वेव्हेल यांच्या योजनेवर काँग्रेस व मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनी वाटाघाटी करून हंगामी स्वरूपाचे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. २ सप्टेंबर १९४६ रोजी, हे मंत्रिमंडळ स्थापन करण्यात आले. तथापि मुस्लिम लीगचे नेते सहकार्याच्या ऐवजी नाना अडथळे व कुरापती मात्र काढीत होते. त्यांना पाकिस्तानशिवाय दुसरी योजना नकोच होती. पाकिस्तानची निर्मिती व मागणी वेडेपणाची आहे हे गांधीजींनी सांगून पाहिले, पण हटवादी मुस्लिमांनी ते

मानले नाही. शिवाय त्यांना आतून ब्रिटिशांची फूस होतीच.

२६ ऑगस्ट १९४६ हा बॅ. जीनांनी पाकिस्तानसाठी कृतिदिन म्हणून पाळण्याचा आदेश मुस्लिमांना दिला. पाकिस्तानची मागणी मान्य झाली नाही तर कत्तली व रक्तपात घडेल अशी धमकीही जीनांनी दिली होती.

गांधीजींना या घटनांमुळे अतिशय दुःख झाले. दिल्लीत नवे व्हॉईसरॉय लॉर्ड मौंटबॅटन कॉंग्रेसच्या व मुस्लिम लीगच्या नेत्यांशी वाटाघाटी करीत होते. पाकिस्तान मान्य केले तर देश स्वतंत्र होणार होता. कॉंग्रेसचे नेते पेचात सापडले होते.

तिकडे बंगाल–बिहारमध्ये जातीय दंगली उसळल्या होत्या. हिंदूंची कत्तल होत होती, त्यांची घरेदारे जाळून टाकण्यात येत होती. स्त्रियांवर अत्याचार चालले होते. नोआखली जिल्ह्यात दंगलीचे स्वरूप फारच भीषण होते. जिवाच्या भीतीने हिंदू निर्वासितांचे लोंढे कलकत्त्यात येत होते. तेथील मुस्लिम मंत्रिमंडळ दंगली शमविण्याऐवजी चिथावणी देत होते.

गांधीजींचे मन द्रवले. या हत्याकांडात दुःखितांचे अश्रू पुसायला, निराधारांना धीर द्यायला व अशांती शमवून शांती प्रस्थापित करायला एकटे गांधीजीच धाऊन गेले. उजाड बनलेल्या, जाळून पोळून खाक केलेल्या गावागावातून गांधीजींची पदयात्रा सुरू झाली. सशस्त्रांनाही त्यावेळी तिथे जाण्यात भय वाटावे, बलदंडांनीही भेदरून माघार घ्यावी असा तो धोकेबाज काळ आणि मुलुख होता. परंतु कृश

शरीरयष्टीचे निःशस्त्र गांधीजी प्रेमाचा ओलावा घेऊन निर्भयपणाने त्या आगीत घुसले. शांतीचा संदेश देताना मुस्लिमांना त्यांनी सांगितले, "एका जरी निर्दोष माणसाचा वध केला तर तो सबंध मानवतेच्या विरूद्ध गुन्हा आहे, असे इस्लाम धर्म सांगतो. अत्याचार करणाऱ्याला शासन करावे हे मी समजू शकतो. पण अन्याय करणारा निघून गेल्यावर त्याच्या निर्दोष जातभाईंना शासन करणे म्हणजे शुद्ध रानटीपणा आहे."

नोआखलीत ते म्हणाले, "मी कुठल्या पक्षाचा वा धर्माचा म्हणून येथे आलो नाही. ईश्वराचा सेवक म्हणून आलो आहे. मानवातील सद्‌वृत्तींवर माझा विश्वास आहे. आज ती सद्‌वृत्ती गुंडगिरीला शरण गेलेली आहे. ती मला जागी करून निर्भय बनवायची आहे. सतींचे अश्रू जर मला पुसता आले तर मी स्वतःला धन्य मानीन."

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर भारताचा स्वातंत्र्यध्वज फडकला. सत्तांतराचा सोहळा दिल्लीत चालला होता. भारतभर स्वातंत्र्यदिन साजरा होत होता. परंतु स्वातंत्र्याचा उद्‌गाता व प्रणेता मात्र नोआखलीच्या वाटेवर माणुसकी जागवीत होता, बंधुभाव फुलवीत होता, घायाळांच्या जखमांवर फुंकर घालीत होता. बंगालमध्ये फिरायचे तर बंगाली बोलायला यायला हवे म्हणून बंगालीचे धडे गिरवीत होता. राम-रहीमची धुन गाजवीत होता. तुटलेले जोडीत होता.

# हे राम

भारतीय स्वातंत्र्य आले, पण देशाची फाळणी झाली. पाकिस्तानची निर्मिती झाली. गांधीजींना फाळणीचे अतीव दुःख झाले. ते म्हणाले, "जीनांच्या द्विराष्ट्रवादाला मी कधीही मान्यता दिली नाही, आणि देणारही नाही. धर्म बदलला म्हणजे राष्ट्रीयत्व कसे बदलते ते अद्यापही माझ्या ध्यानात येत नाही. भौगोलिक दृष्टीने देशाचे तुकडे झाले तरी त्यात एक आत्मा निर्माण करण्याचा प्रयत्न मी करीन."

आणि गांधीजी फाळणीमुळे उद्भवलेल्या निर्वासितांच्या सेवेला लागले. काश्मीरवर टोळीवाल्यांच्या साहाय्याने पाकिस्तानने आक्रमक हल्ला केला. गांधीजी काश्मीरकडे धावले. तेथल्या निर्वासितांच्या छावणीत गेले. काश्मीरवरील हल्ला परतविण्यासाठी हिंदी सैन्य तेथे गेले होते, त्याबद्दल गांधीजी म्हणाले, "काश्मीरच्या महाराजांच्या आणि तेथील जनतेच्या विनंतीवरून हल्लेखोरांना हाकून लावण्यासाठी हिंदी सैन्य तेथे गेले आहे. सारे आक्रमक जेव्हा काश्मीरच्या भूभागावरून बाहेर पडतील, काश्मीरमध्ये सर्वत्र शांतता व सुव्यवस्था होईल, तेव्हा हिंदी सैन्य काढून घेण्यात येईल आणि तेथल्या जनतेच्या मताप्रमाणेच तेथला कारभार चालेल."

स्वातंत्र्याचा सोहळा पार पडला न पडला तोच दिल्लीमध्ये

जातीय दंगलीने पेट घेतला. दिल्ली काबीज करण्याचे बेत दंगलखोर रचीत होते. दिल्लीच्या दंगलीने सारा देश भडकण्याचा संभव होता. गांधीजी तडक दिल्लीकडे धावले. म्हणाले, “ माझ्या देशाच्या राजधानीत दंगल होत आहे. हिंदु-मुसलमान तेथे सुखासमाधानाने राहू शकत नाहीत. मग मी कोणत्या तोंडाने पाकिस्तानला सांगू की तुमच्याकडले दंगे थांबवा म्हणून. आधी मी दिल्लीत शांतता करीन आणि नंतर पाकिस्तानकडे जाईन. ”

गांधीजींनी दिल्लीत शांतीकार्य सुरू केले. दंग्याच्या भीषणतेमुळे सारे दिल्ली शहर भयाभीत बनले होते. हिंदू, मुसलमान, शीख, अनेक लोक मारले गेले होते.

गांधीजींनी बिर्ला भवनात मुक्काम ठेवला. त्यावेळी त्यांचीही प्रकृती तशी बरी नव्हती. ताप येत होता, परंतु तशाही परिस्थितीत गांधीजी दिल्लीच्या दंगलग्रस्त भागात गेले. ठिकठिकाणच्या निर्वासितांच्या छावणीतून गेले. त्यांचे सांत्वन केले, प्रार्थना प्रवचनांतून शांतीचा प्रचार करू लागले, पण अविश्वासाचे वातावरण काही निवळेना. तेव्हा गांधीजींनी उपवास घोषित केला. १३ जानेवारी १९४८ रोजी, त्यांचा उपवास सुरू झाला. त्यांच्या उपवासाच्या वार्तेने भारत व पाकिस्तान हादरून गेले. मुसलमानांनाही आता कळून चुकले होते की गांधीजी हेच आपले खरे मित्र व हितकर्ते आहेत.

उपवासाने काळजीचे वातावरण देशभर पसरले. गांधीजींची प्रकृती खालावू लागली. यातून मार्ग काढण्यासाठी

सर्वपक्षीय नेते एकत्र आले आणि त्यांनी एक सात कलमी प्रतिज्ञा–पत्रक तयार केले. त्यात त्यांनी दिल्लीत शांतता प्रस्थापित करण्याचे व सुखशांतीने राहण्याचे आश्वासन दिले होते. भारताच्या प्रत्येक नागरिकाला निर्भयपणाने व प्रतिष्ठेने राहण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्याचे अभिवचन सर्वांनी दिल्यावरच गांधीजींनी आपला उपवास, १८ जानेवारी १९४८ रोजी सोडला.

गांधीजींच्या शांती-प्रयत्नानेही काही जातीयवाद्यांची माथी भडकलेली होती. गांधीजींच्यावर ते मुसलमानधार्जिणे आहेत असा आरोप करीत होते. गांधीजींच्या धोरणांमुळे भारताचे नुकसान होत आहे, असे त्यांना वाटे. आणि अशांपैकीच एकाने १९ जानेवारीच्या सायंप्रार्थनेत खुद्द गांधीजींवरच बॉम्ब टाकण्याचा प्रयत्न केला. नेम चुकला नि गांधीजी वाचले. दुसऱ्या दिवशी प्रार्थनासभेत म्हणाले, “ ज्याने बॉम्ब टाकला त्याचे भले होवो ! मी पोलिसांना सांगितले आहे की त्याला कसलाही त्रास देऊ नका. त्याचे मन जिंकण्याचा प्रयत्न करा. अशा प्रकारे मृत्यू येत असताही जर माझ्या चेहऱ्यावर प्रसन्नता राहिली आणि दुष्कृत्य करणाऱ्याच्या बद्दल यत्किंचितही राग मनात नसला तर ती खरी गौरवाची गोष्ट आहे. ”

गांधीजींची इच्छा यापुढे पाकिस्तानात जाऊन शांती-कार्य करण्याची होती. यापुढे आपले कार्यक्षेत्र तेथेच आहे हे त्यांनी जाणले होते. कॉंग्रेसनेही यापुढे लोकसेवक बनावे अशी

त्यांची इच्छा होती. सत्तेच्या स्पर्शाने कॉंग्रेसचा होणारा अधःपात गांधीजींच्या दूरदृष्टीला त्याचवेळी दिसला होता. म्हणून ' लोकसेवक संघ ' या स्वरुपात कॉंग्रेसने राहावे असा त्यांचा आग्रह होता. लोकसेवक संघाच्या घटनेचा कच्चा आराखडाही त्यांनी तयार केला होता.

आणि अखेरीस तो अशुभ दिवस उगवला. दिवसभर गांधीजींनी नेहमीप्रमाणेच आपली कामे केली. सरदार पटेलांशी काही महत्त्वाची बोलणी चालली होती; तेवढ्यातच सायंप्रार्थनेची वेळ झाली. थोडा उशीरच झाला होता. गांधीजी प्रार्थनास्थळी निघताना म्हणाले, " दहा मिनिटे उशीर झाला आहे. उशीर मला मुळीच खपत नाही. " म्हणून झपझप पावले टाकीत निघाले. तोच एकजण लगबगीने आला आणि गांधीजींच्या चरणांना स्पर्श करून उभा राहिला. दुसऱ्याच क्षणी त्याने हातातले पिस्तुल गांधीजींवर झाडले. नथूरामच्या तीन गोळ्यांनी गांधीजींचा देह कोसळला.

" हे राम ! " शेवटचे शब्द गांधीजींनी उच्चारले आणि ते ईश्वरचरणी लीन झाले !

" हाडामासांचा असा एक माणूस काल–परवा आमच्यामध्ये होता यावर पुढच्या पिढ्यांचा विश्वासही बसणार नाही." असे उद्गार विज्ञानमहर्षी अल्बर्ट आइन्स्टिन यांनी गांधीजींच्या निधनाची वार्ता ऐकून काढले. गांधीजींच्या अलौकिक व असामान्य व्यक्तिमत्त्वाचा गौर[illegible] जीवन आणि थोडक्या शब्दांत त्यांनी केला आहे

दा. क्र. ५५५ दिनांक
विषय क्र.
BVBK-0400955